सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक १४ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ..तर काँग्रेस मुस्लिमाला पक्षाचा अध्यक्ष का करत नाही?
## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल

हिसार : पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हरियाणातील हिसारमध्ये काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करत धार्मिक तुष्टीकरण, वक्फ कायदा, संविधानाचा अपमान आणि मुस्लिमांच्या नेतृत्वावरील अपुऱ्या प्रतिनिधित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. त्यांनी काँग्रेसवर मुस्लिमांच्या नावाने केवळ लांगूलचालन केल्याचा आरोप करत विचारलं, जर खरोखर मुस्लिमांविषयी सहानुभूती असेल, तर काँग्रेसने आजपर्यंत कधी मुस्लिम व्यक्तीला पक्षाच्या अध्यक्षपदी का नेमलं नाही?

मुस्लिमांचा वापर, पण नेतृत्व नाही – मोदींची काँग्रेसवर बोचरी टीका

पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसने नेहमीच मुस्लिमांच्या नावाने केवळ मतांसाठी राजकारण केलं, पण त्यांच्या प्रगतीसाठी कोणताही ठोस निर्णय घेतला नाही. वक्फ कायद्यात सुधारणा करून निवडणूक गमावू नये यासाठी संविधानाच्या तत्वांवरच घाला घातला. काँग्रेसने कट्टरपंथीयांना खूश ठेवण्यासाठी बहुसंख्य मुस्लिम समाजाचं नुकसान केलं.

वक्फ कायद्यावरून काँग्रेसवर टीका

पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०१३ मध्ये काँग्रेसने वक्फ कायद्यात बदल करून संविधानाच्या मूल्यांना दुखावलं. जर योग्य नियोजन केलं असतं, तर आज मुस्लिमांना पंक्चर झालेल्या सायकली दुरुस्त करत बसावं लागलं नसतं.

डॉ. आंबेडकरांचा अपमान केल्याचा आरोप

आज बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे. त्यांनी सामाजिक न्यायाचं स्वप्न पाहिलं होतं. पण काँग्रेसने त्यांचा अपमान केला, त्यांना निवडणुकीत हरवलं, त्यांच्या विचारांना गाडण्याचा प्रयत्न केला, असा आरोपही त्यांनी केला.



आरक्षण, णउउ, आणि संविधानाचं राजकारण

मोदींनी काँग्रेसवर संविधानाचा वापर सत्तेसाठी हत्यार म्हणून केल्याचा आरोप करत सांगितलं की, काँग्रेसने धर्माच्या आधारावर आरक्षण दिलं, एससी/एसटी/ओबीसींना न्याय मिळाला की नाही हे तपासण्याचीही कधी गरज वाटली नाही. उलट कर्नाटकमध्ये त्यांच्या सरकारने धार्मिक आरक्षण देऊन संविधानाची भावना पायदळी तुडवली.

त्याचप्रमाणे, उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू केला असताना काँग्रेसने त्यालाही विरोध केला. संविधान प्रत्येक नागरिकासाठी समान कायद्याची ग्वाही देतो, पण काँग्रेसने तो निवडणुकीसाठी मोडला, असा आरोपही त्यांनी केला.

उड्डाण सेवा आणि विकासाचे वचन

या कार्यक्रमात त्यांनी हिसारमधील हरियाणाच्या पहिल्या विमानतळाचे उद्घाटन करत, चप्पल घातलेला सामान्य माणूसही आता विमान प्रवास करेल, असे सांगितले. २०१४ पूर्वी केवळ ७४ विमानतळ होते, आता ती संख्या १५० च्या पुढे गेली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती - मुख्यमंत्री

मुंबई : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, असे ठणकावून सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मुंबई आणि महाराष्ट्र हे एकमेकात रमलेले आहे. भाषावार प्रांतरचनेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच झाली असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि बाबासाहेब यांचे अतूट नाते असल्याचे प्रतिपादित केले.



वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी संबोधित केले. कार्यक्रमास व्यासपीठावर सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार कॅप्टन तमिल सेलवन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईतील त्यांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी राज्य शासन इंदू मिल येथे त्यांचे भव्य स्मारक साकारत आहे. त्यांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. संविधानाच्या तत्त्वावर देशाचा कारभार सुरू आहे. या संविधानानेच देशाच्या महासत्तेचा मार्ग प्रशस्त केला आहे. बाबासाहेबांचा पुतळा हा संविधानशिवाय अपूर्ण असतो. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून शोषित, पीडित लोकांना न्याय देण्याचे काम केले. संविधानाने सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. संविधान निर्माण करताना त्यांची दूरदृष्टी आणि बुद्धीची प्रगल्भता लक्षात येते.

# राज्यात पुढील २ दिवस अवकाळी पावसाचा इशारा

मुंबई : महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पाऊस सुरूच आहे, तर काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट सुरूच आहे. दुसरीकडे, अवकाळी पावसासाठी अनुकूल वातावरण देखील निर्माण झाले आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागात पुढील एक ते दोन दिवसांत अवकाळी पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. दरम्यान, अकोला येथे ४२.४ सर्वाधिक तापमान नोंदविले गेले. तर, जळगाव, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात रविवारी (दि.१३) गारासह अवकाळी पाऊस झाला.

पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावरील सक्रिय कमी दाबाचे क्षेत्र संपले आहे. राजस्थानच्या पश्चिमेकडून विदर्भाच्या उत्तरेकडे कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. यातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यात पावसासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाच्या प्रक्रियेलाही वेग आला. त्यामुळे काही भागांत पावसाचा अंदाज आहे.पुढील दोन दिवस नंदुरबार, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड या भागांत पावसाचा अंदाज आहे.सोमवार (दि.१४) नंतर लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळमध्ये जोरदार पाऊस पडेल. या काळात ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहतील. कोकण, मुंबई, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# तामस्यात मध्यरात्री दोन गटात तुंबळ राडा व गुन्हे दाखल
## दोन्ही गटाच्या १४० वर जणांविरुद्ध गुन्हे; तामसा शहरात तणावपूर्ण शांतता

तामसा - तामसा येथील जुने बसस्थानक परिसरातील आंबेडकर चौकात भीमजयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लावलेले बॅनर फाडल्याचा कारणावरून दोन गटात राडा झाल्याची घटना दि. १३ रोजी रात्री १२ वाजाताचे दरम्यान घडल्याने सगळीकडे खळबळ उडाली आहे. दोघांनी दिलेल्या परस्परविरोधी तक्रारीवरुन दोन्ही गटाच्या १४० च्यावर जणांविरुद्ध ट्रॉसिटी व दरोडासहविविध कलमान्वय गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील दोन आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे. तामसा शहरात तणावपूर्ण शांतता असून घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील तणाव नियंत्रणासाठी १४ रोजी सोमवारी पहाटेपासून जुने बसस्थानक परिसर व गावात राज्य राखीव दलाच्या कर्मचाऱ्यासह पोलीस बंदोबस्तासाठी तैनात केली आहे.

हदगाव तालुक्यातील तामसा येथील जुने बसस्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात रात्री नऊच्या सुमारास महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे शुभेच्छा बॅनर लावण्याचे काम सुरू होते. मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या हातगाडा चालकांनी महापुरुषांचे बॅनर लावण्यास विरोध केल्याने तणाव वाढला होता. रात्री १० नंतर दोन्ही गट उग्र बनल्याने बाचाबाची झाली. पोलीसांनी जायमोक्यावर



जाऊन हस्तक्षेप केला होता. त्यानंतर मध्यरात्री दोन्ही गट आमनेसामने येऊन त्यांच्यात राडा झाला. पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे पुढील अनर्थ टळला. झालेल्या राड्यानंतर नागोराव जाधव यांच्या तक्रारीवरून डॉ. आंबेडकर यांचे जयंती बॅनर फाडून राहुल जाधव याला मारहाण करून जखमी केल्याच्या आरोपाखाली ग्रामपंचायत सदस्य सलीम चौधरी (बागवान) यांच्यासह अकरा जणांच्या नावाने व इतर शंभरावर जनांविरुद्ध ट्रॉसिटीसह विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. तर दुसऱ्या सलीम चौधरी (बागवान) यांच्या फिर्यादीवरून नागोराव जाधव यांच्यासह ३२ जणांच्या नावाने व ईतर पाच ते सहा जणाविरुद्ध बॅनर लावण्यावरून वाद घालत दुकानांची तोडफोड करीत रोख रक्कम जबरीने नेल्याप्रकरणी दरोडासह विविध कलमान्वय गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान राडा प्रकरणातील सलीम चौधरी (बागवान) व अलीम बागवान या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान पोलीस प्रशासनाने आंबेडकरी अनुयायाविरुद्ध एकतर्फा मोठ्या संख्येने कारवाया केल्याचे आरोप करीत निषेधार्थ संतप्त महिलांनी सोमवारी तामसा पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला होता. घटनेनंतर अतिरिक्त पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी तामसा येथे भेट देत परिस्थितीची पाहणी केली .

### अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात

**घडलेल्या घटनेमुळे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर तणाव वाढू नये यासाठी शहरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाकडून अफवा रोखण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. जनतेने अफवानवर विश्वास न ठेवता भीमजयंती उत्साहात साजरी करावी असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर होते.**

# सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित करणे हेच डॉ. आंबेडकरांना अभिवादन
## रा.स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर

पुणे, दिनांक १४ एप्रिलः महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समरसतेचा आणि समतेचा संदेश आजही प्रासंगिक आहे. संविधान निर्मितीच्या वेळी त्यांनी राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक स्वातंत्र्याची गरज व्यक्त केली. आज खऱ्या अर्थाने संपूर्ण समाजाने त्यासाठी प्रयत्न करायला हवे. समाजात समरसता आणि एकोप्याचा भाव निर्माण करणे हेच त्यांना अभिवादन ठरेल, अशी भावना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी व्यक्त केली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी पुणे रेल्वे स्टेशन जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रा. स्व. संघाचे पुणे महानगर संघचालक रविंद्र वंजारवाडकर आणि रा.स्व. संघाचे अधिकारी उपस्थित होते. डॉ. आंबेकर पुढे म्हणाले, तत्कालीन समाजापुढे अनेक अडचणी असतानाही डॉ. आंबेडकरांनी देश आणि समाजाच्या एकसंघतेसाठी प्रयत्न केले. भारतीय समाजातील विशेष करून हिंदू समाजातील एकता आणि आवश्यक त्या सुधारणांकरिता अतिशय ठोस प्रयत्न त्यांनी केले. संविधान निर्मितीत डॉ. आंबेडकरांचे योगदान अतुलनिय असून, आज कोणीही काहीही म्हणत असले तरी संपूर्ण देश संविधानानेच चालतो. आपआपसातील हेवेदावे आणि भेद विसरून समरसतेच्या वातावरणासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. अभिवादनानंतर सुनील आंबेकर यांनी समाजातील विविध कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

# भारताचा वैदिक दृष्टिकोन आपत्ती व्यवस्थापनात जागतिक मार्गदर्शक ठरेल : स्वामी रामदेव
## पतंजलीचे सेंटर ऑफ एक्सलन्स जागतिक आपत्ती निवारणासाठी मैलाचा दगड - आचार्य बाळकृष्ण

हरिद्वार, १२ एप्रिल. पतंजली विद्यापीठात 'हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्ती औषध' या विषयावर आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आज उद्घाटन झाले. या कार्यशाळेत चार देशांतील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. कार्यशाळेत स्पेन विद्यापीठाचे प्रा. रुबेन, जागतिक बँकेच्या डिझास्टर मेडिसिन ग्रुपचे अध्यक्ष इटलीहून प्रा. रॉबर्टो मुगावेरो, नॉर्वे विद्यापीठातील प्राध्यापक. बी. सिटौला आणि नेपाळ आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा. बी. अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी पतंजली विद्यापीठात 'डिझास्टर मेडिसिन, मॅनेजमेंट आणि क्लायमेट चेंज' या विषयावरील इंटरनॅशनल



सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना आणि उद्घाटनही करण्यात आले. याशिवाय विद्यापीठात पेटंट सेलही स्थापन करण्यात आला.

कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात उपस्थितांना संबोधित करताना पतंजली विद्यापीठाचे कुलपती आणि जगप्रसिद्ध योगी स्वामी रामदेव म्हणाले की, हे केंद्र भविष्यात जागतिक स्तरावर आपत्ती आणि त्यातून उद्भवणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी उपयुक्त ठरेल. त्सुनामी असो, बिहार पूर असो किंवा केदारनाथ दुर्घटना असो, प्रत्येक आपत्तीमध्ये पतंजलीने मानवता आणि समाजसेवेसाठी नेहमीच अग्रणी भूमिका बजावली आहे. पतंजलीच्या सामर्थ्याचा, विचाराचा आणि आत्म्याचा हा परिणाम आहे की प्रत्येक आपत्तीत मदत करणाऱ्यांमध्ये आपण प्रथम आहोत. भारतीय आणि सनातन संस्कृतीतून आपत्ती व्यवस्थापन शिकण्यावरही त्यांनी भर दिला.

यावेळी पतंजली विद्यापीठाचे कुलगुरू तथा आयुर्वेद शिरोमणी आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, हे इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स आगामी काळात जागतिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापन आणि लोककल्याणासाठी पद्धतशीर पुढाकार घेईल. पतंजलीने यापूर्वी केदारनाथ दुर्घटना, नेपाळ भूकंप आणि बिहार पूर यांसारख्या आपत्तींमध्ये अग्रणी भूमिका बजावून मानवतावादी कार्य केले आहे. आपल्या भाषणात सनातन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करताना आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन आणि लोककल्याणाच्या क्षेत्रात भारताच्या प्राचीन परंपरा नेहमीच मार्गदर्शक ठरल्या आहेत. पतंजली विद्यापीठात स्थापन करण्यात आलेले हे इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स जागतिक स्तरावर आपत्ती आणि शोकांतिकेला सामोरे जाण्यासाठी केवळ संशोधन आणि उपाय विकसित करणार नाही, तर भारतीय सनातन संस्कृतीच्या मूल्यांना पुनर्संचयित करण्याच्या दिशेने एक प्रभावी उपक्रम ठरेल, असेही ते म्हणाले. जागतिक आपत्ती औषध आणि व्यवस्थापनासाठी आणि संशोधन, प्रशिक्षण आणि सहकार्याच्या दिशेने भविष्यातील धोरणे विकसित करण्यासाठी ही कार्यशाळा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी सांगितले.

# आ.प्रशांत बंब यांच्याहस्ते उड्डाणपूल, भुयारी मार्गाचे भुमीपूजन



गंगापूर दि.१४ : वाहनधारक नागरिकांसाठी डोकेदुखी ठरलेल्या लासुर स्टेशन येथील रेल्वे गेटच्या कामाला आज प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते याकामाचे भूमी पूजन करण्यात आले या ठिकाणी होणारा उड्डाण पूल व भुयारी मार्ग पूर्ण होण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे.येथील रेल्वे गेट क्रमांक ३४ लगत भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सरपंच मीना पांडव उपसरपंच संपत छाजेड बाजार समितीचे माजी सभापती शेषराव जाधव माजी सरपंच प्रदीप भुजबळ यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या ठिकाणी उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग व्हावा अशी नागरिकांची अनेक वर्षापासून मागणी होती रेल्वे गेटमुळे नागरिकांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता या ठिकाणाहून दिवसभरात २० हून अधिक रेल्वेच्या फेऱ्या होतात प्रत्येक फेरीच्या वेळेस रेल्वे गेट बंद होत असल्याने नागरिकांना किमान १५ मिनिटे वाट बघावी लागत होती उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# कला पुनरावलोकन: 'मध्यमा – आत्म्याचा प्रवास'. आशिमा मेहरोत्रा

आजकाल, कलाकार आशिमा मेहरोत्रा यांचे एकल चित्र प्रदर्शन मध्यमा – अ जर्नी ऑफ द सोल प्रेक्षकांना –खत्रऊ-उड च्या गॅलरी 'इ' मध्ये एक खोल भावपूर्ण आणि चिंतनशील प्रवासासाठी आमंत्रित करत आहे. हे प्रदर्शन १२ एप्रिल २०२५ पासून लोकांसाठी खुले आहे. 'मध्यमा' हा शब्द वैदिक तत्त्वज्ञानातून घेतला गेला आहे, जो कोणत्याही सर्जनशील अभिव्यक्तीपूर्वी आपल्यामध्ये उद्भवणाऱ्या मूक आणि अव्यक्त संवादाचा संदर्भ देतो. हे सूक्ष्म आणि न सांगणारे क्षण आशिमाच्या कलाकृतींचा आत्मा आहेत. हे प्रदर्शन कोणत्याही एका थीमपुरते मर्यादित नाही, तर विविध मूड आणि भावनिक रंगांचा सचित्र संगम आहे – प्रत्येक काम एक नवीन अनुभव, स्वत:चा एक नवीन स्तर उलगडून दाखवतो.

सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला आणि दक्षिण आफ्रिकेचे उच्चायुक्त



श्री अनिल सूकलाल आणि त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी –खत्रऊ-उड चे अध्यक्ष श्री बिमल बिहारी दास, सदस्य संचालन आणि व्यवसाय विकास/रेल्वे बोर्ड हितेंद्र मल्होत्रा, खठत्रऊ चे उचऊ श्री मनोज कुमार दुबे आणि सुश्री नीरजा सरीन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मान्यवर उपस्थितीने कार्यक्रम अधिकच उल्लेखनीय झाला. आशिमा मेहरोत्रा या प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत, ज्यांनी बालपणापासूनच कलेचा वापर आत्म-अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून केला आहे. त्याने वयाच्या पाचव्या वर्षी चित्र काढायला सुरुवात केली आणि शब्द वापरण्यापूर्वी रंगांशी संवाद साधायला शिकला. २०१९ मध्ये त्यांच्या भावाच्या अकाली निधनानंतर त्यांनी त्यांच्यातील कलाकाराला जिवंत केले आणि सार्वजनिक व्यासपीठावर आपली कला सादर केली.

त्यांचे पहिले एकल प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी (मुंबई) येथे भरवण्यात आले, ज्याला देश-विदेशात दाद मिळाली. त्यांच्या एका कलाकृतीने न्यूयॉर्क कला स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावला आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना विशेष ओळख मिळवून दिली.

प्रदर्शनातील काही प्रमुख कलाकृती पुढीलप्रमाणे आहेत.

'गेझ' (२०२५) – एक शक्तिशाली आणि स्व-संवादात्मक दृष्टी प्रतिबिंबित करणारे कार्य.

'नीलवर्णा' (२०२१) आणि नीलवर्णा २.० (२०२०) – निळ्या रंगांमध्ये आध्यात्मिक खोली आणि शांतीचा अनुभव घ्या.

'होली सिटी' (२०२२) – अध्यात्म आणि शहरीपणाचा संगम असलेल्या पवित्र शहराची प्रतिमा. 'विवत्सा' (२०२५) – जटिल मानवी भावनांचे, विशेषतः घृणा यांचे शक्तिशाली कलात्मक व्याख्या.

'मध्यमा' हे केवळ प्रदर्शन नाही, तर आत्म्याशी संवाद साधण्याची संधी आहे. हा अनुभव प्रेक्षकांना त्यांच्या आत पाहण्याची, अनुभवण्याची आणि त्यांच्या अस्तित्वाशी जोडण्याची प्रेरणा देतो.

# संतोष विठोबा झगडे यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान



मुंबई : कोकण मराठी पत्रकार संस्था प्रथम वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी गणेश मंगल कार्यालय कालकाई मंदिराशेजारी, भरणे नाका ता. खेड जिल्हा रत्नागिरी येथे आयोजित शानदार संमारंभात समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या कोकण रत्नाच्या सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री, रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. उदय सामंत साहेब त्याचप्रमाणे गृह राज्य मंत्री मा. ना. योगेशदादा कदम साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संतोष विठोबा झगडे यांना सन्मानपूर्वक समजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संतोष विठोबा झगडे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील सैतवडे गावचा. स्वतःच्या जन्म झालेल्या जिल्ह्यात या पुरस्कारासाठी संतोष विठोबा झगडे यांची निवड झाली हा त्यांचा मोठा गौरव आहे. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून दैनिक प्रहार चे संपादक सुकृत खांडेकर, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली चे कुलगुरू मा. ना. श्री संजय भावे, दैनिक पुढारीचे निवासी संपादक शशिकांत सावंत,वसई विरार पत्रकार संघांचे अध्यक्ष अनिलराज रोकडे, महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट मुंबई चे अध्यक्ष. श्री अजय जी बिरवटकर फॉरवर्ड सीमेन्स युनियन चे अध्यक्ष श्री. नरेश बिरवाडकर हे व इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन कोकण मराठी पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. एकनाथ बिरवटकर यांनी केले होते.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१४ एप्रिल -**

सहकारमहर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या वाढदिवसा निमित्त चाकूर तालुका कॉग्रेस कमेटी, शहर कॉग्रेस कमेटी व ग्रामीण रूग्णालय चाकूर यांच्या संयुक्त विद्यमाने चाकूर शहरातील ग्रामीण रूग्णालयात दि.१८ एप्रिल रोजी शुक्रवारी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी व मोफत मोंतिबंदु शस्त्रक्रीया शिबिर आयोजित करण्यात आले आहे.



शिबिरामध्ये तपासणी केलेल्या ज्या रूग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया गरजेची आहे अशा रुग्णांच्या डोळ्याची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून शस्त्रक्रिया केलेल्या रूग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहेत. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून रूग्णांची तपासणी करण्यात येणार आहे.

तरी चाकूर तालुक्यातील व चाकूर शहरातील व परीसरातील नागरिकांनी या मोफत नेत्र शिबिरांचा व मोतिंबिंदू शस्त्रक्रीया शिबीराचा लाभ घ्यावा, असे आहवान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विलासराव पाटील चाकुरकर, पप्पुभाई शेख यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### शिरूर अनंतपाळ पं.स.मध्ये डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.१४ एप्रिल -**

शिरूर अनंतपाळ पंचायत समिती सभागृहामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी शिरूर अनंतपाळ विधायक कृती समितीचे अध्यक्ष राम काकडे व उत्तम कदम यांच्याकडून भारतरत्न डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राजनारायण बिरादार व इतर कार्यकर्ते त्यांचा सहभाग या ठिकाणी होता. या सर्वाकडून या ठिकाणी सर्वप्रथम डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



### दैठणा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**शिरूर अनंतपाळ, दि.१४ एप्रिल -**

उत्तर दैठणा येथील आंबेडकर चौकामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी रावसाहेब पाटील, उपसरपंच योगेश बिरादार, सरपंच शेषराव कांबळे, दिलीप मेजर यांच्याकडून भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी गावातील विलास कांबळे, प्रदीप कांबळे, शहाजी कांबळे, बाबुराव कांबळे, सतीश कांबळे, संभाजी कदम, पंढरी कांबळे, बाबू टिपराळे, दयानंद चांबर्गे, नागेश कांबळे, भाऊराव सुतार, भीमराव कांबळे या सर्वांकडून डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



### उत्तर शेंद येथे डॉ. आंबेडकर यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.१४ एप्रिल -**

उत्तर शेंद येथील प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पद्माकर त्र्यंबक माने यांच्या उपस्थितीत शाळेतील विद्यार्थी व शाळेतील शिक्षक चौंसष्टे, गीरी या सर्वांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



### १ लक्ष पानांच्या वाचनातून डॉ. आंबेडकरांना कृतीशील मानवंदना

**लातूर, दि.१४ एप्रिल -**

येथील जनकल्याण निवासी विद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती अभिनव पद्धतीने साजरी करण्यात आली. सकाळी बुद्धवंदना म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. विद्यालयातील १८४ विद्यार्थांनी १३४ व्यक्ती चरित्राच्या पुस्तकांचे वाचन केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती म्हणून विद्यार्थ्यांनी किमान १३४ विविध विविध चरित्राचे वाचन केले. १८४ विद्यार्थ्यांनी १ लाख पानांचे वाचन केले. यावेळी शालेय अभ्यासक्रमातील पुस्तकासोबत विविध पुस्तकांचे वाचन मुलांनी केले. हा अभिनव उपक्रम वसतिगृह अधीक्षक दत्ता माने, सागर कद्रे, गुणवंत राठोड, अंकुश साखरे यांनी राबविला.

### लताबाई भोपनीकर यांचे निधन

**देवणी, दि.१४ एप्रिल -**



देवणी बाजार समितीचे माजी सभापती गोविंद भोपणीकर यांच्या सुविध पत्नी लताबाई भोपणीकर (वय ६५) यांचे दीर्घ आजाराने देवणी येथे राहत्या घरी सोमवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती गोविंदराव भोपनिकर, १ मुलगा, २ मुली, जावई, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## डॉ. आंबेडकरांचे विचार समाजात रुजवाविण्याची गरज : आ. संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१४ एप्रिल -**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपस्थित समाज बांधवांना जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करुन बुद्धवंदना घेण्यात आली.

यावेळी बोलताना संजय बनसोडे यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र दिला. आपण सर्वजण महाम ानवांचे अनुयायी आहोत.

समाजाच्या हिताकरिता आपण सर्वांनी एकत्र येवून युवा पिढीला बाबासाहेबांनी सांगितलेल्या म ार्गावर जीवनाची वाटचाल करुन प्रत्येकाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समाजात रुजवाविण्याची गरज असल्याचे सांगितले.

उदगीर हे चळवळीचे शहर आहे. मागील काळात या शहराची ओळख संपुर्ण जगभरात विश्वशांती बुद्ध विहाराच्या माध्यमातून गेली आहे.

येत्या जुन-जुलैपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदगीर शहरातील पुतळा लवकरच उभारणार असुन मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करणार असल्याचे ही बनसोडे यांनी सांगितले.



यावेळी भंन्ते नागसेन बोधी, गोविंदराव केंद्रे, राजेश्वर निटुरे, सिद्धेश्वर पाटील, श्रीरंग कांबळे, उषा कांबळे, ॲड. वर्षा कांबळे, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, पोनि. दिलीप गाडे, पोनि. राजकुम ार पुजारी, देविदास कांबळे, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, प्रा. मल्लेश झुंगास्वामी, दिलीप सोनकांबळे, बालाजी गायकवाड, अनिल मुदाळे, विलास शिंदे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरोळ ग्रामपंचायतची स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ एप्रिल**

येरोळ तालुका (शिरूर अनंतपाळ) येथील ग्रामपंचायत कार्यालयात सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत संरपच सुकुमार लोकरे व उपसरपंच सतिश सिंदाळकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प हार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून ग्रामपंचायतीच्या वतीने पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून गावातील स्वच्छता राखण्यासाठी घरातील कचरा गोळा करण्यासाठी दोन इलेक्ट्रॉनिक घंटा गाडीचे संरपच लोकरे व उपसरपंच सतिश सिंदाळकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

यावेळी गावातील पंचेवीस आशा कार्यकर्ती यांना कचरा साठवून ठेवण्याचे बकीट देण्यात आले असून उर्वरित गावातील एक हजार घरांना कचरा साठवणूक बकिट भेट रुपी देण्यात येणार असल्याचे सरपंच सुकुमार लोकरे यांनी सांगितले.

गावातील रस्ते गल्ली, बोळ भागात ग्रामपंचायतीने सिमेंट, गट्टू रस्ते बनविल्याने गाव स्वच्छ दिसत आहे. मात्र अपुऱ्या जागे मुळे घरातील कचरा नागरिकांकडून रस्त्यावर टाकल्याने गावातील नाल्या बंद पडणे व रस्त्यावर अस्वच्छता वाढत होती. ग्रामपंचायतीने एक पाऊल पुढे नवीन विकासाकडे टाकत गावातील घरातील कचरा उचलण्यासाठी घंटा गाडी सुरू केले.

यावेळी सुर्यकांत येरोळकर, शिवानंद भुसारे, प्रभाकर पालकर, भिवाजी लोकरे, संभाजी कांबळे, बालाजी महाराज साकोळकर, भानूदास बसपुरे, प्रकाश बनसोडे, दयानंद बनसोडे, एल.जी. लोंढे, गणेश महाराज, रतन सिंदाळकर, विनोद लोंढे, बालाजी झटे, बाबूराव वाघमारे, सुभाष लोंढे, सोमनाथ हिडोळे आशा कार्यकर्ती नागरिक उपस्थित होते.

## शेळके व नेलवाडे यांच्यातर्फे अनाथांना एक महिन्याचे राशन वाटप

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ एप्रिल -**

सामाजिक कार्यात नेहमी पुढाकार घेणाऱ्या आकाश साळूंके यांच्या राधाकृष्ण फाऊंडेशनमार्फत रस्त्यावर भटकणाऱ्या निराधार अनाथांची सेवा गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे.



सावनगिरा गावातील हा तरुण आपल्या कष्टातून हे कार्य सातत्याने करत असून, सोशल मीडियावर तो या सेवाकार्याची माहिती शेअर करत असतो.

त्याच्या कार्याने प्रेरित होऊन, हलगरा गावचे सुपुत्र आणि सध्या मुंबईत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत विजय गोरख शेळके यांनी सामाजिक जाणिवेतून एक महिन्याचे दहा हजार रुपयांचे रेशन देत संस्थेला आर्थिक मदत केली. त्यांच्या सोबत त्यांचे ससारे आर. के. नेलवाडे यांनीही पाच हजार रुपयांची देणगी देत सहकार्य केले.

ही मदत आकाश साळूंके यांच्या कडे सुपूर्त करण्यात आली. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव जाधव एम.एम., पंजाबराव देशमुख शिक्षण परिषदेचे तालुकाध्यक्ष जाधव ए.पी., मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष आर.के. नेलवाडे, गोरख विश्वनाथ शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

## उदगीर येथे जागतिक होमिओपॅथीक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१४ एप्रिल -**

होमिओपॅथी चिकित्सा शास्त्र-पद्धतीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनीमन यांची जयंती आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक होमिओपॅथी दिन म्हणून साजरी केली जाते. या निमित्ताने होमिओपॅथी डॉक्टर्स असोसिएशन, शाखा-उदगीरच्या वतीने डॉ. मदने हॉस्पिटल व डॉ. कोठारे क्लिनिक, नाईक चौक, देगलूर रोड, उदगीर येथे डॉ. सम्युअल हॅनीमन यांच्या प्रतिमेचे पूजन, अभिवादन तथा होमिओपॅथी चिकित्सा पद्धती व आरोग्यदायी जीवन या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होमि ओपॅथी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत कोठारे हे होते. व्यासपीठावर धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, उदगीरचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, यु.डी.ए. अध्यक्ष डॉ.गोविंद सोनकांबळे, निमा अध्यक्ष डॉ. राजकुमार घोनसीकर, डॉ. श्रीकांत मध्वरे, डॉ. भिकमचंद सोनी, डॉ. इसा खान परभणीकर हे उपस्थित होते.

## वाचाव कसं हे सांगणार पुस्तक म्हणजे उत्तम वाचक : अमृत देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१४ एप्रिल -**

मला वाचन करायला वेळच मिळत नाही. वाचलेलं लक्षातच राहत नाही. वाचन करता करता मला डुलकी लागते. कळतच नाही मी खूप हळूहळू वाचन करतो. मी बरीच पुस्तके वाचलीत पण अर्धवटच वाचून सोडलेली आहेत. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे उत्तम वाचक घडविणाऱ्या सात सवयी हे पुस्तक होय, असे मत अमृत देशमुख यांनी व्यक्त केले.

बुकलेट गाय म्हणून जगप्रसिद्ध असलेला एक वाचन वेडा तरूण, ज्याने लाखो रुपयांची सीए ची नोकरी सोडून लोकांना वाचते करण्याचा विडा उचलला. ज्याचे नाव अमृत देशमुख असून त्याने व्हाट्सप च्या माध्यमातून मिशन मेक इंडिया रीड या चळवळीच्या अंतर्गत लाखो लोकांना वाचते केले. त्यांनी ऑडिओ आणि टेक्स्ट मेसेजच्या माध्यमातून हजारो पुस्तके लोकांसम ोर ठेवली. ज्यामुळे व्हाट्सप ने त्यांच्यावर बंदी आणली. तेव्हा त्यांनी स्वतःचा बुकलेट ॲप तयार केला.



शेवटी व्हाट्सप ने स्वतः माफी मागून अमृतचा व्हाट्सप चालू केला. आज साऱ्या जगात ज्याचे ७५ लाख फालोअर्स आहेत.

स्वतःला पूर्णपणे वाचण्यासाठी वाहून घेतलेल्या ठाणे, मुंबईच्या अमृत देशमुख यांनी चला कवितेच्या बनात अंतर्गत उदगीर येथे चालू असलेल्या ३३४ व्या वाचक संवाद मध्ये उत्कृष्ट असा संवाद साधून प्रभावित केले.

डॉ. नरेंद्र शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या वाचक संवाद मध्ये अमृत देशमुख यांनी स्वलिखित उत्तम वाचक घडविणाऱ्या सात सवयी या साहित्यकृतीवर संवाद साधून वाचकांमध्ये नवऊर्जा चेतवली. सुरवातीला राही व माही पत्तेवार या दोघींनी गीतेचे श्लोकाचे गायन केले. तर शर्वरी सोमवंशी या विद्यार्थीनीने तीने वाचलेला भाग ऐकवला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक अनंत कदम यांनी केले. तर आभार मुरलीधर जाधव यांनी मानले.

## रामलिंग शेरे राज्यस्तरीय आदर्श उपसरपंच पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१४ एप्रिल -**

देवणी तालुक्यातील धनेगांव ग्राम पंचायतीचे उपसरपंच रामलिंग शेरे यांना यावर्षीचा राज्यस्तरीय आदर्श उपसरपंच पुरस्कार स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने हा पुरस्कार सिनेअभिनेते मंकरद अनासपुरे यांच्या हस्ते शेरे यांना देण्यात आलो.

धनेगांव (ता. देवणी) येथील युवा उपसंरपच यांनी गावच्या विकासासाठी भरीव असे योगदान दिले आहे. पाणी, आरोग्य, शिक्षण या तिन गोष्टी मूबलक व चांगल्याप्रम ाणे राबवला तर गावातील प्रत्येक उंबरठ्याचा विकास होईल. उबरठ्यांचा विकास म्हणजे गावचा विकास होय हे ओळखून धनेगांव हे गांव पाणीदार करण्यासाठी नाला सरळीकरण खोलिकरण, सिएनबी बांध, तसेच आरोग्य उपकेद्र, जिल्हा परिषद शाळा शैक्षणिक व भौतिक सुविधा देवून आमुलाग्र बदल घडवुन आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. प्रत्येकानां वयैक्तिल लाभाच्या योजना, भटक्या सम ाजातील वडार व बंजारा समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एकूण तिनशे ४४ घरे मंजूर कूरुन या लोकाचे पक्का घराचे स्पंन साकार करण्याचे काम रामलिंग शेरे यांनी केले आहे.



यावेळी सिनेअभिनेते मंकरद अनासपुरे, सरपंच सेवा संघाचे बाबासाहेब पावसे पाटील, ढाकणे, व्यंकटराव बिरादार, संगाप्पा चरपले, सोमनाथ बिरादार, जंयत पाटील, किशोर बिरादार, दयानंद पोतदार, नागेश बिरादार, प्रणव बिरादार आदी उपस्थित होते.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात महामानवाला अभिवादन

**लातूर, दि.१४ एप्रिल -**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरात जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस संकुलाचे सचिव प्राचार्य डी.एन. केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, अश्विनी केंद्रे, कविता केंद्रे, स्वाती केंद्रे, वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ एप्रिल -**

येथील बौद्धनगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संविधानाचे शिल्पकार असलेल्या डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रम ाची सुरुवात झाली. ध्वजारोहण ॲड. संभाजीराव पाटील यांच्या हस्ते, तर अध्यक्षस्थानी प्रभाकरराव कुलकर्णी होते.



या कार्यक्रमाला ॲड. जयश्री पाटील, पोनि. विठ्ठल दराडे, नगराध्यक्षा मायावती धुमाळे, महादेव आवाळे, धोंडिराम सांगवे, गणेश धुमाळे, बसवराज मठपती, अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, संतोष शिवणे, संतोष शेटे, देविदास सांगवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## महापुरुषांच्या विचारांवर आधारलेला एकसंघ समाजच राष्ट्राला संपन्नतेकडे नेऊ शकतो : प्रा.डॉ. होनराव

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१४ एप्रिल -**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात समता सप्ताहानिमित्त प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात श्री हावगीस्वामी म हाविद्यालय, उदगीर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. दत्तहरी होनराव यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा आणि आजचे वास्तव या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रामचंद्र तिरुके होते.

यावेळी मंचावर संस्था सदस्य प्रा. म नोहर पटवारी, सामाजिक कार्यकर्ते रंगा राचुरे, प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे, पर्यवेक्षक प्रा.एस. व्ही. मुडपे उपस्थित होते.



प्रा.डॉ. होनराव यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, भारतीय राज्यघटना ही शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये पात्रता निर्माण करणारी असून ती सर्वसमावेशक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरे राष्ट्रनिष्ठ विचारवंत होते. मी प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीय ही बाबासाहेबांची भूमिका आज प्रत्येक नागरिकाने अंगीकारण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर.के. मस्के यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.जी.जी. जेवळीकर यांनी तर आभार प्रा.डॉ.बी.एस. भुकतरे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ एप्रिल**

शहरातील डॉ आंबेडकर चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पूतळ्यास जयंतीनिमित्त लोकप्रतिनिधी, अधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते, आंबेडकर प्रेमींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात सोमवारी मोठ्या उत्साहात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड, पूतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर, कोषाध्यक्ष जगजीतराज खुराणा, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, पोनि नरेंद्र पाडळकर यांच्यासह पूतळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्याहस्ते पंचशील ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी बोलतांना पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला महान संविधान दिले आहे. न्याय, समता, बंधुता, स्वातंत्र्य या मुल्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला अधिकार आणि कर्तव्य दिली आहेत. प्रत्येकाने त्यांनी लिहीलेल्या संविधानाचे पालन करावे.

दिलीप चव्हाण यांनी त्यांच्या भाषणात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधानाच्या माध्यमातून मजबुत लोकशाही दिली आहे. जगातील सर्व देशांचा अभ्यास करून त्यांनी भारतासाठी सर्वसमावेशक असे संविधान लिहीले. त्यांना जीवनात संघर्ष करावा लागला. अठरा अठरा तास वाचन करून देशातील प्रत्येक जाती धर्माला न्याय देण्यासाठी त्यांनी संविधान लिहीले. आपण सर्वांनी या संविधानाचा आदर केला पाहीजे.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी अनेकांनी रक्तदान करीत डॉ आंबेडकरांना अभिवादन केले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी गोकुळ बंडाळे, पूतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर यांच्यासह मान्यवरांची तसेच स्वयंसेवकांची उपस्थिती होती.

# काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदासाठी अनिल नैनवाणी आघाडीवर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ एप्रिल**

हिंगोली जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर शनिवारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत अनेकांनी जिल्हाध्यक्षपदासाठी ईच्छा बोलून दाखवली परंतु स्व राजीव सातव यांचे अत्यंत निकटवर्तीय तसेच सर्वसमावेशक असलेले अनिल नैनवाणी यांचे नाव जिल्हाध्यक्ष पदाच्या आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात काँग्रेस पक्ष डबघाईला आला आहे. विधानसभा निवडणुकीत माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी नाकारल्यामुळे त्यांनी बंडखोरी केली. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघात माजी आ. गोरेगावकर यांच्या समर्थकांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. लवकरच माजी आ. गोरेगावकर आणि त्यांचे समर्थक शिंदे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे हिंगोली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसची वाताहत झाली आहे. जे नेते मंडळी आहे ती केवळ कार्यक्रमापुरती आणि फोटोसशन पुरतीच उरली आहे. परंतु विधानपरिषदेच्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांचे समर्थकांनी अजूनही काँग्रेस पक्षाचे अस्तित्व हिंगोलीत टिकवून ठेवले आहे.

माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि आ. डॉ प्रज्ञा सातव यांच्यातील गटबाजीमुळे काँग्रेसमध्ये दोन गट निर्माण झाले होते. त्यामुळे प्रत्येक बैठकीस, आंदोलनास एक गट गैरहजर राहात होता. मात्र या दोन गटामध्ये जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई यांची मात्र चांगलीच अडचण होत होती. दोन्ही गटांना सांभाळतांना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत होती. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते पक्षापासून अलिप्तच आहेत. मागील दोन ते अडीच वर्षापासून जिल्हाध्यक्षपद सांभाळणारे दिलीप देसाई यांनी अखेर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनमा दिला आहे. त्यामुळे पक्षाला चांगलाच धक्का बसला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे कळमनुरी तालुक्यातच पक्षाला मोठे खिंडार पडण्याची भिती व्यक्त होत आहे.

नुकतीच काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली. यावेळी पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष पदाबाबत चर्चाही करण्यात आली. यामध्ये हिंगोलीचे माजी नगरसेवक अनिल नैनवाणी, सुरेशअप्पा सराफ, जि प सदस्य विनायक देशमुख, माजी नगराध्यक्ष अब्दुल हाफीज यांच्यासह आणखी काही इच्छुकांनी जिल्हाध्यक्ष पदी आपलीच वर्णी लागावी अशी ईच्छा बोलून दाखवली आहे. परंतु माजी नगरसेवक अनिल नैनवाणी यांचे पारडे जड मानले जात आहे. पक्षाशी एकनिष्ठ राहून काम करणारा तसेच माजी खा स्व राजीव सातव यांचे विश्वासू कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. तसेच शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्यांच्या प्रश्नावर वेळोवेळी आंदोलन देखील केले आहेत. तसेच विद्यमान आ. डॉ प्रज्ञा सातव त्यांच्या निवडीबाबत सकारात्मक असल्याचे बोलले जात आहे.



**हिंगोली– येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, उमेश गुठ्ठे, ज्योती वाघमारे, सचिन शिंदे, आशिष जैस्वाल आदी. छाया– विजय गुंडेकर**

# शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ एप्रिल**

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवशंभो ढोल पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली त्यानंतर समिती पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त हिंगोली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी समितीच्या शिवशंभो महिला ढोल पथकाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीनिमित्त देण्यात आली. यानतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे अध्यक्ष मधुकरराव मांजरमकर सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष ॲड उल्हास पाटील, बौध्द महासभेचे भिसे, कल्याण देशमुख ॲड दिलीप भाकरे, बालाजी वानखेडे, खंडेराव सरनाईक प्रा. केळे, हेंबाडे, पोलीस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, दिपक मांजरमकर, डॉ. दीपक मोरे, कलानंद जाधव, राजकुमार वायचाळ, वानखडे गुरुजी, गणेश गरड, हरिभाऊ मुटकुळे, शिवशंभो ढोलपथक प्रमुख योगीता देशमुख, सुनिता मूळे, वैशाली पाटील, ज्योती कोथळकर, हेंबाडे, साधना घ्यार यांच्यासह महिला भगिनी भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भांड्याची पेटी मोफत मिळणार अशी बतावणी करीत वृध्द महिलेस लुटणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ एप्रिल**

वृध्द महिलेला भांडयाची पेटी फुकट मिळणार म्हणुन जबरीने लुटणा–या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे.

दिनांक ०१ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजण्याचे सुमारास सरकारी दवखाना, इमारतीच्या बाहेर मोकळ्या जागेत विमल वामन विसावे, वय ६५ वर्ष, रा. कन्हेरगाव, ता.जि. हिंगोली या वृध्द महिलेस अज्ञात आरोपी इसमाने तुम्हाला रोजगार हमी योजनेची भांडयाची पेटी फुकट पाहिजे असल्यास माइयासोबत चला असे म्हणुन सदर वृध्द महिलेस व तिच्या मुलीस हिंगोली बाहेर आडोश्याला नेवुन जबरीने अंगावरील दागीने काढुन घेतल्याबददल पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्था.गु.शा. पो.नि. विकास पाटील यांना सुचना देवुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नेमले होते. त्याअनुषंगाने तात्रिक विश्लेषन व गोपनिय माहिती याव्दारे स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीची माहिती काढली असता सदरचा जबरीने चोरी करणारा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार नागोराव सुखदेव श्रीरामे, वय २८ वर्ष, रा.हनकदरी, ता. सेनगाव असे असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून आरोपीविरूध्द पोलीसांनी सापळा लावुन हिंगोली शहरातुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर आरोपीने गुन्हयाची कबुली देवुन वृध्द महिलेच्या अंगावरील जबरीने लुटलेले ५४ तोळे चांदिचे दंडकडे, पाटल्या, काकणे व ०७ ग्रॅम सोन्याची पोत असा एकुण १ लाख ३० हजार रूपयेचा चोरी गेलेला पुर्ण मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

आरोपी हा गंभीर स्वरूपाचा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन यापुर्वी सुध्दा वृध्द महिलांना गाठुन वेगवेगळे बहाणे सांगुन अनेक वेळा जबरी चोरी केली आहे. तसेच एक वृध्द महिलेचा खुन करून अंगावरील दागीने लुटले आहेत. तसेच आरोपी हा यापुर्वी पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण केंद्र चालवत असल्याने भरतीपुर्व प्रशिक्षणार्थांची फसवणुक करून पैसे लुबाडल्याचे व अनेकवेळा घरफोडी केल्याचे सुध्दा गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे यानंतर सुध्दा सदर आरोपी आपल्या भागात आल्यास नागरीकांनी विशेषतः महिलांनी सतर्क राहण्याबाबत पोलीसांनी आवाहन केले आहे. सदर आरोपीस गुन्हे शाखेच्या पोलीसांनी वेळीच ताब्यात घेतल्याने अशा स्वरूपाच्या गुन्हयास प्रतिबंध होण्यास मदत होणार आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पो. नि विकास पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोउपनि विक्रम विठुबोने, पोलीस अंमलदार प्रेम चव्हाण, लिंबाजी वाव्हळे, राजु ठाकुर, किशोर सावंत, विशाल खंडागळे, आकाश टापरे, दत्ता नागरे, रवी स्वामी यांनी केली आहे.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उत्साहात साजरी









**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ एप्रिल**

महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती जिल्ह्यात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

सेनगाव तालुक्यातील जवळा बु कै पंडित गुरुजी वाचनालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्ता किशन शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गजानन शिंदे हे उपस्थित होते. वाचनालयाचे ग्रंथपाल दत्ता शिंदे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास वाचक कु. अंकिता शेळके, आरती शिंदे, शिवकन्या लगड, शिवकन्या देवकर नेहा खेडेकर, श्रद्धा खेडेकर, शिवम शिंदे, कृष्ण गाडगीळ आदींसह वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास विद्यार्थी वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राहोली खुर्द शाळेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शा. व्य.समितीचे अध्यक्ष रमेश गरड उपस्थित होते उद्दघाटक म्हणून शाळेचे मुख्याध्यापक गजानन बोरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सचिन भाऊ गरड, ॲड.अरविंद नरवाडे, शामराव फुंडसे, प्रकाश घरबुडवे, राम खिल्लारे, संगीता खिल्लारे उपस्थित होते.या प्रसंगी पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी भाषणे आणि गीत गायन केले. विशेष म्हणजे या कार्यक्रमात अभिनंदन घोंगडे, शिक्षिका सौ सिंधूताई दहिफळे आणि संगीता खिल्लारे यांनी भिमगीते सादर केली. संविधनाविषयी अरविंद नरवाडे यांनी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ.सिंधूताई दहिफळे यांनी केले तर प्रास्ताविक अभिनंदन घोंगडे यांनी केले. यावेळी शिक्षीका तसेच गावकरी उपस्थित होते. येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे जनक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती १४ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नाहीत, तर ते एक विचार आहेत, एक प्रेरणा आहेत. त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजातील शोषित, वंचित आणि दलित घटकांच्या उन्नतीसाठी दिला. आज आपण बाबासाहेबांच्या विचारांना पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. शिक्षण घ्यावे, स्वतःचा विकास करावा आणि समाजात सकारात्मक बदल घडवावा, हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल. असे विचार याप्रसंगी मांडण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेंद्र साहू यांच्यासह प्राध्यापक मंडळी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषदेतही भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, समाज कल्याण अधिकारी राजू एडके आदींची उपस्थिती होती. येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयातही भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपमुख्याध्यापक जे एस भट्ट यांनी प्रतिमे पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी शिक्षक उपस्थित होते.

## अग्रलेख...

# वक्फ सुधारणा आवश्यकच होती

समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी सुधारणा करणारे कायदे महत्त्वाचे ठरतात. असे असताना संसदेच्या दोन्ही सभागृहांत वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाल्याच्या घटनेची नोंद घ्यावी लागेल. समाजातील धार्मिक तसेच सांस्कृतिक घटकांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने टाकलेले हे एक पाऊल आहे. म्हणूनच या कायद्याचा इतिहास, बदलाची आवश्यकता आणि त्याच्या परिणामांचा सखोल विचार करणे आवश्यक ठरते. वक्फ किंवा वक्फ बोर्ड ही संकल्पना भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात आहे. मुघलांच्या आधीची सल्तनत 'दिल्ली सल्तनत' म्हणून ओळखली जाते. त्याद्वारे सर्वप्रथम भारतात वक्फची संकल्पना आली. मोईझुद्दीन घौर तेव्हाचे शासक होते. त्यांनी दोन गावे वक्फ म्हणून जामा मशिदीच्या संतांच्या हाती दिली. संकल्पना अशी की, कोणतीही चल वा अचल मालमत्ता धर्मकार्य, दान स्वरूपात आपण वक्फ म्हणून देऊ शकतो. पण कोणी ही मालमत्ता विकू शकत नाही, दुसऱ्याला भेट स्वरूपात देऊ शकत नाही. त्याची जन्मजात मालकी मिळू शकत नाही आणि ती गहाण ठेवू शकत नाही. या सगळ्या महत्त्वाच्या बाबी अत्यंत काटेकोरपणे पाळणे अपेक्षित होते.

इतिहासाचा धांडोळा घेतला तर 'लँग्वेजेस ऑफ पॉलिटिकल इस्लाम' या पुस्तकात अभ्यासक मुजफ्फर आलम म्हणतात की, इंग्रज येण्याआधी भारतात धर्मांतराशी वक्फचा जवळचा संबंध होता. म्हणजेच लोकांकडून दान, मदत म्हणून दिल्या जाणाऱ्या जमिनींचा वापर इस्लामिक व्यक्तींचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला गेला. पुढे रिचर्ड ईर्टन यांचे पुस्तक आले. त्यांच्या 'अॅप्रोचेस टू स्टडी ऑफ कन्व्हर्जन टू इस्लाम इन इंडिया' नामक पुस्तकातही वक्फशी सूफी संतांचा जवळचा संबंध होता आणि याच्या साह्याने धर्मांतर केले जात असे, असे म्हटले आहे. ब्रिटिश काळात या व्यवस्थेत फारसा हस्तक्षेप केला गेला नाही. त्यांनी वक्फमधील अनागोंदी, गैरव्यवहार याकडे कानाडोळा केला. थोडक्यात वक्फच्या प्रशासनात ढवळाढवळ केली नाही. मुळातला वक्फ कायदा १९२३ चा होता. त्यानुसारच सगळ्या वक्फ मालमत्ता व्यवस्थापित होत असत. मात्र स्वातंत्र्यानंतर १९५४ मध्ये भारत सरकारने वक्फ कायदा पारित केला आणि त्यातून वक्फच्या मालमत्तेचे प्रशासकीय अधिकार केंद्रीय पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला. याच कायद्यांतर्गत वक्फ बोर्डाला अनेक अधिकारही दिले गेले. मात्र याविरुद्ध मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली. भारत सरकार यात का दखल देत आहे, असे म्हणत रोषही व्यक्त झाला. एकूणच वक्फ बोर्डाने सरकारी हस्तक्षेप अजिबात मंजूर केला नाही.

या पृष्ठभूमीवर वक्फ सुधारणा विधेयक मंजूर होऊन आता हा कायदा लागू करण्यात आला आहे. त्या अंतर्गतही वक्फ बोर्डातील प्रशासकीय यंत्रणा, कारभार सुनियंत्रित करण्याचा विचार आहे. वक्फ बोर्डाच्या मॅनेजमेंटमध्ये सुधारणा करणे, हाच या दुरुस्तीमागील मुख्य हेतू आहे. याविषयी बोलताना गृहमंत्री अमित शाह यांनी अनेक मुद्यांना स्पर्श केला. वक्फ ही संकल्पना केवळ मुसलमानांसाठी लागू होते. असे असताना आधी मुस्लिमेतर समाजातील लोकांच्या जमिनीदेखील वक्फ बोर्ड हडपत होते. त्यामुळेच शाह यांनी मुस्लिमेतर समाजाची मालमत्ता वक्फ बोर्डाच्या अंतर्गत येऊ शकत नाही, ही बाब स्पष्ट केली. त्यामुळेच पुढील काळात वक्फ बोर्डाने हडपलेल्या मुस्लिमेतर समाजाच्या मालमत्ता मूळ मालकांना परत मिळण्याची शक्यता वाढली आहे. मुळात इथे सरकारला मुस्लिम समूहाच्या धार्मिक बाबींमध्ये वा त्यांना मिळणाऱ्या देणग्यांमध्ये दखल देण्याची अजिबात इच्छा दिसत नाही. सरकार या बाबींमध्ये हस्तक्षेप करू इच्छित नाही. दुसरी बाब म्हणजे वक्फ बोर्डावर सरकार कोणत्याही मुस्लिमेतर व्यक्तीला बसवणार नाही. खेरीज वक्फच्या कोणत्याही ऑफिसमध्ये मुस्लिमेतर व्यक्तीची नोंद करण्यात येणार नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्माचे पालन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. हे भारताच्या संविधानातच सांगितले आहे. मात्र, एखाद्यामध्ये लालसा उत्पन्न करण्यासाठी, घाबरवण्यासाठी किंवा एखादा लाभ दाखवून धर्मांतर करण्याचा भाग पाडणे आणि त्यासाठी वक्फच्या मालमत्तेचा गैरवापर करणे नियमबाह्य असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

खेरीज केंद्रीय गृहमंत्र्यांनी हेदेखील स्पष्ट केले की, वक्फ बोर्डामधील को-खटले वा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी न्यायालयापुढे गेल्या पाहिजेत. ते वक्फ न्यायाधिकरणात जाऊन चालणार नाही. कोर्टातच याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. जमिनीचे रेकॉर्ड ठेवणे वा यासारख्या गोष्टींसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे काही अधिकार आहेत. त्यामुळे वक्फ बोर्डातील काही अनागोंदी वा तक्रारींसंदर्भात जिल्हाधिकारीही लक्ष घालू शकतात. याचे कारण असे की, कर्नाटकमधील दलपीठ देवळाच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने मालकी सांगितली आहे. इतकेच नव्हे, तर ख्रिश्चन समुदायाच्या अनेक मालमत्तांवरही त्यांनी दावा केला आहे. कब्जा करण्याचा प्रयत्न केला आहे. तेलंगणातील ६६ हजार कोटी रुपये किमतीच्या १७०० एकर जमिनीवरही वक्फ बोर्डने कब्जा करण्याचा प्रयत्न केला. हे सर्व लक्षात घेता सरकारने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. यापुढेही वक्फ बोर्डाला देणगी देणारे, त्याचे नियमन करणारे पूर्वीच्याच पद्धतीने काम करतील. त्यात सरकार हस्तक्षेप करणार नाही. मात्र नियमनाच्या आणि गैरव्यवहार रोखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची राहील. एखादी जमीन खरेच वक्फची आहे की सरकारची, हे जाणून घेण्याचे अधिकार या पदावरील व्यक्तीला मिळतील. शेवटी कोणत्याही जमिनीवरील हक्क वा मालकीची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रात येतात. तेव्हा आपण दुसरी पर्यायी यंत्रणा राबवू शकत नाही, असे केंद्र सरकारने यायोगे स्पष्ट केले आहे.

दुसरी आणि सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे अलिकडच्या या दुरुस्तीकडे एकटेपणाने नव्हे तर एकत्रितपणे बघायला हवे. म्हणजेच सीए (सिटिझनशिप अमेंडमेंट अॅक्ट), ट्रिपल तलाकशी संबंधित कायदा या सगळ्याद्वारे सरकार अल्पसंख्यकांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करताना दिसते. कारण यामध्ये विधवा, अनाथ भरडले गेले आहेत. वक्फ बोर्डने मालमत्ता हडपल्यामुळे काहींना प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. या लोकांना जाणीवपूर्वक मिळकतीपासून दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच ही दुरुस्ती अडचणीत आलेल्या अल्पसंख्यक समाजाला योग्य ती कायदेशीर मदत पुरवू शकेल, यात शंका नाही.

जगभरातले इराण, इराक, सीरिया, टर्की यासारखे अन्य मुस्लिम देश बघितले तर त्या प्रत्येक ठिकाणी वक्फची कार्यपद्धती नियंत्रित करण्यासाठी केंद्रीय कायदे असल्याचे दिसते. तेथेही कोणत्याही एका बोर्डाला देणगी वा भेट स्वरूपात मिळालेली मालमत्ता सांभाळण्याचे वा त्याविषयीचे निर्णय घेण्याचे स्वायत्त अधिकार मिळत नाहीत. कारण असे अधिकार असणे कायदा-सुव्यवस्था आणि सुप्रशासनामध्ये बाधा आणणारी बाब आहे. म्हणूनच ताजी दुरुस्ती भारतातील यासंबंधीच्या कायद्यातील त्रुटी दूर करेल. वक्फ बोर्डने अनेकांच्या जमिनी घेतल्या असून, त्यातून लाखोंची मिळकत येत आहे. अशा प्रकारे अयोग्य पद्धतीने लाटलेल्या जमिनी मूळ मालकांना, त्यांच्या वारसांना परत मिळाल्या तर अनेकांना मोठी मदत होईल. तेव्हा मतपेटीकडे डोळा ठेवून मुस्लिम समुदायाला भ्रमित करण्याचा आरोप इथे होता कामा नये. इथे हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, काँग्रेसचे सरकार असलेल्या २००६ च्या काळात जस्टिस सच्चर समितीचा अहवाल आला होता. त्यामध्येदेखील वक्फच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता स्पष्टपणे मांडण्यात आली होती. वक्फ बोर्डाकडे येणारी मिळकत त्यांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनींच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले होते. समितीच्या माहितीप्रमाणे बोर्डाकडे असणाऱ्या मालमत्तेतून किमान १२ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र त्याच्या एक-दोन टक्केही मिळकत नाही. म्हणूनच आता या सर्व त्रुटी दूर होतील आणि बोर्डाचा स्वच्छ कारभार अनुभवायला मिळेल, अशी आशा वाटते.

---

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# बांगलादेशही चीनचा मांडलिक?

भारताभोवती 'गळफास' तयार करण्याच्या ज्या योजनेवर चीन मागील काही वर्षांपासून काम करीत होता, त्याचा शेवटचा अध्याय संपलेल्या आठवड्यात चीनची राजधानी बीजिंगमध्ये लिहिला गेला. ज्या बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात भारताने निर्णायक भूमिका बजावली, तो बांगलादेशही चीनचा मांडलिक झाला.

**भारताचा तडाखा :** बांगलादेशच्या या भूमिकेच्या विरोधात भारताने या देशाला एक तडाखा देत भूतान, नेपाळ व म्यानमार या देशांशी बांगलादेशचा व्यापार अवघड करून टाकला. भारताने २०२० मध्ये एक निर्णय घेत बांगलादेशला या देशांशी व्यापार करणे सुगम- सोपे व्हावे म्हणून त्याला आपल्या भूमीवरील कस्टम केंद्रावरून व्यापारी सामानाची वाहतूक करण्याची परवानगी दिली होती. यामुळे बांगलादेशला नेपाळ, म्यानमार, भूतान या देशांना निर्यात करणे सोपे झाले होते. भारताने आता ही सवलत काढून घेतल्याने बांगलादेशला आपल्या वस्तूंची या देशांना निर्यात करणे अवघड जाईल.

**चिनी कारस्थान :** चीन शांतपणे, कोणताही गाजावाजा न करता भारताच्या विरोधात कोणते व कसे कारस्थान करीत आहे याचे नेमके वर्णन दोन दशकांपूर्वी प्रकाशित झालेल्या 'चायनीज नायटमेर, अमेरिकाज ड्रीम- इंडिया एज द नेक्स्ट ग्लोबल पॉवर' या विल्यम एवरीच्या पुस्तकात करण्यात आले आहे आणि दोन दशकांतील सारा घटनाक्रम या पुस्तकातील वाक्यन् वाक्य खरा ठरविणारा राहिला आहे. बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस नुकतेच चीनच्या दौऱ्यावर जाऊन आलेत. चीनच्या राष्ट्रपतींची त्यांची फार सुखद भेट झाली असावी असे दोघांच्या छायाचित्रावरून दिसून येते.

**अंदाज खरा ठरला :** बांगलादेशात वर्षभरापूर्वी जो सत्ताबदल घडवून आणण्यात आला, त्यात पाकिस्तानची आयएसआय व चीन दोघांचाही सहभाग असावा असा एक कयास बांधला जात होता तो खरा असावा असे आता घडत असलेल्या घटनांवरून वाटते. पाकिस्तान-बांगलादेश हे परस्परांचे कट्टर शत्रू. आता या दोघांमध्ये सलोखा झाला. बांगलादेश-चीन यांच्यातही फार सुखद संबंध नव्हते. आता त्यांच्यातही सलोखा तयार होत असताना दिसत आहे. याचा अर्थ बांगलादेशातील सत्ताबदल हा काही स्थानिक नव्हता, तर तो घडविण्यात आला होता असा स्पष्ट निष्कर्ष काढला जात आहे.

**'रॉ'चे अपयश :** चीन व पाकिस्तान बांगलादेशात एवढी मोठी उलथापालथ घडवून आणण्याचे कारस्थान करीत असताना भारताच्या 'रॉ' या गुप्तचर संस्थेला याचा मागमूसही लागू नये याचे आश्चर्य वाटते. 'रॉ'ने अनेकदा देशासाठी उल्लेखनीय कामगिरी बजावली



आहे. विशेषत; १९९९ मध्ये कारगिल युद्ध सुरू असताना, पाकिस्तानचे लष्करप्रमुख बीजिंगच्या दौऱ्यावर होते. त्यांनी आपल्या हॉटेलमधून इस्लामाबादला केलेला दूरध्वनी 'रॉ'ने टेप केला होता आणि ते संभाषण भारतासाठी फार मोलाचे ठरले होते. यावेळी 'रॉ'ला बांगलादेशात होत असलेल्या घटनाक्रमाचा काहीच सुगावा लागू नये? 'रॉ'च्या काही अधिकाऱ्यांच्या या अपयशाची मोठी किंमत भारताला मोजावी लागली आणि आता बांगलादेश चीनच्या घशात गेल्यासारखाच आहे.

**वादग्रस्त विधान :** भारताच्या पूर्वोत्तर भागावर भाष्य करीत मोहम्मद युनूस यांनी 'हा सारा भाग भूभागाने वेढलेला आहे आणि बांगलादेशचा समुद्रकिनाराच काय तो या भागाचा संरक्षक आहे' असे वादग्रस्त विधान केले आहे. चीनने बांगलादेशात भरपूर गुंतवणुक करावी, आम्ही त्यांच्या स्वागतासाठी सज्ज आहोत असेही युनूस म्हणाले असल्याचे प्रसिद्ध झाले आहे. चीन-बांगलादेश यांच्यात एवढी जवळीक व्हावी हे जरा आश्चर्यकारक आहे. या दोन देशांत एवढी जवळीक कधीही नव्हती. बांगलादेशने चीनला एकप्रकारे आपल्या देशात हात-पाय पसरण्यासाठी निमंत्रण दिलेले आहे. भारतासाठी यापेक्षा धक्कादायक घटना कोणती असू शकेल? भारताला कोंडीत पकडण्याच्या चीनच्या कारस्थानात भूतान, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव या देशांवर चीनची पकड मजबूत झाली आहे . भारताच्या शेजारी देशांपैकी फक्त बांगलादेश काय तो भारताच्या बाजूने खंबीरपणे उभा होता. अर्थात शेख हसीना पदावर असेपर्यंत. त्यांनी चीनशी सामान्य संबंध ठेवले होते पण त्यांचा कल भारताकडे होता. त्या पदच्युत झाल्यापासून चीन-बांगलादेश जवळीक वाढत गेली आणि आता मोहम्मद युनूस यांच्या ताज्या चीन भेटीने ही जवळीक समोर आली आहे.

**मुख्य अडसर :** बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांना नवी दिलीत राजकीय आश्रय देण्यात आला आहे. भारत सरकारचा हा निर्णय योग्य असाच आहे. बांगला देशात हसीना यांच्या विरोधात काही खटले दाखल करण्यात आले आहेत. त्यासंदर्भात भारताने त्यांना आपल्या ताब्यात द्यावे अशी मागणी बांगलादेशने भारत सरकारकडे केली आहे. भारत ही मागणी मान्य करू शकत नाही. भारताने ही मागणी मान्य करता कामाही नये. बांगलादेशची ही मागणी केवळ एक निमित्त असल्याचे मानले जाते. बांगलादेशला चीनच्या गोटात दाखल व्हावयाचे आहे. त्यासाठी एक निमित्त म्हणून त्याने शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केली जात आहे. भारत शेख हसीना यांना आपल्या ताब्यात देणार नाही याची पूर्ण कल्पना बांगलादेश सरकारला आहे. आजवर भारतासाठी बांगलादेशची सीमा सुरक्षित मानली जात होती. आता ती स्थिती राहणार नाही. चीन, पाकिस्तान या दोन्ही सीमा संवेदनशील असताना, यात बांगलादेशची भर पडली आहे. येणाऱ्या काळात बांगलादेश-चीन मैत्रीचे नवे नवे अध्याय समोर येतील आणि भारतासाठी ही बाब निश्चितच दु:खद राहणार आहे. कारण बांगलादेशच्या निर्मितीत भारताने फार मोलाची व निर्णायक भूमिका बजावली होती. ५४ वर्षांपूर्वी भारताने केलेले उपकार विसरीत बांगलादेशने चीनचा हात धरावा यापेक्षा अधिक दुर्दैव कोणते?

**ट्रम्प नरमले :** दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांना अखेर माघार घ्यावी लागली. चीन वगळता अन्य देशांवर त्यांनी लागू केलेले आयातशुल्क ९० दिवसांसाठी स्थगित करण्याची घोषणा केली. आपल्या निर्णयाची किंमत साऱ्या जगाला चुकवावी लागत आहे. साऱ्या जगातील शेअर बाजार कोसळत आहेत. जागतिक मंदीची अशुभ पावले येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत हे ट्रम्प यांच्या लक्षात आले असावे.

**जनअसंतोषाचा परिणाम? :** साऱ्या अमेरिकेत ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शने सुरू होत आहेत. केवळ तीन महिन्यांपूर्वी सत्तेवर आलेल्या एका राष्ट्रपतीच्या विरोधात अमेरिकन जनता कधी रस्त्यावर उतरली नव्हती. ट्रम्प यांचे सल्लागार कोण, असे प्रश्न आता अमेरिकेत विचारले जात असून, याचा पहिला फटका त्यांचे उद्योगपती मित्र एलन मस्क यांना बसला आहे. ट्रम्प सत्तेवर आल्यापासून मस्क यांची संपत्ती वाढली. म्हणजे टेस्ला या त्यांच्या कंपनीच्या शेअरचे भाव वाढले. पण, प्रत्यक्षात टेस्ला कारचा खप कमी झाला. २०२५ च्या पहिल्या तिमाहीत टेस्लाने विकलेल्या मोटारींची संख्या १५ टक्के कमी झाली आहे. काही ठिकाणी तर टेस्लाच्या शो रुमवर निदर्शने झाली आहेत. पण, ट्रम्प बेदरकार होते. एखादा आजार दूर करण्यासाठी कडू औषध द्यावेच लागते अशी त्यांची प्रतिक्रिया होती. मात्र जनअसंतोषाची दखल त्यांना घ्यावी लागली. अमेरिकेचे माजी राष्ट्रपतीही परंपरा बाजूला सारीत ट्रम्प यांच्या विरोधात बोलू लागले होते. या साऱ्याचा परिणाम ९० दिवसांच्या 'युद्धबंदीत' झाला.

---

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# ६० बँका, २००८ पतसंस्था

युनायटेड नेशन्स, म्हणजेच 'युनो' या जगातील सर्व देशांचे प्रतिनिधित्व असणाऱ्या संस्थेने २०२५ हे आंतरराष्ट्रीय 'सहकार वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. सहकाराचे महत्त्व लक्षात घेऊन भारत सरकारनेही काही वर्षांपूर्वीच सहकार मंत्रालयाची निर्मिती केली आहे. एकीकडे 'बिना सहकार नहीं उद्धार' असे म्हणून, त्याच पद्धतीने व्यवहार करून अतिशय स्वच्छ आणि नेत्रदीपकही कारभार करणाऱ्या सहकारी आर्थिक संस्था आहेत. फारशी उलाढाल नसलेल्या कृषी खरेदी-विक्री, बाजार समिती अशाही लाखो संस्था महाराष्ट्रात नीटनेटके काम करीत आहेत. अर्थातच मोठी उलाढाल नसल्यामुळे त्यांचे गैरप्रकारही लहानच असतात. त्यामुळे फारशी चर्चा होत नसली तरी, गैरप्रकार म्हणजे भ्रष्टाचारच. पण ते फारसे चर्चेचा विषय होत नाहीत. सहकारी क्षेत्रातील मोठ्या संस्था म्हणजे प्रामुख्याने साखर कारखाने, सूतगिरण्या या कृषी आधारित आणि सहकारी बँका व पतसंस्था या आर्थिक संस्था असतात. जितक्या मोठ्या संस्था तितका गैरप्रकार आणि भ्रष्टाचार मोठा असे सरळसरळ गणित असते. या साऱ्याच मोठ्या सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षांत राजकारणाने पोखरून टाकले आहे. राजकीय माणसांनी 'सहकारातून स्वाहाकार' करून या संस्था पार देशोधडीला लावल्या आहेत. महाराष्ट्रातील कित्येक सहकारी साखर कारखाने आणि सूतगिरण्यांच्या उद्ध्वस्त आणि मोडकळीला आलेल्या इमारती आणि यंत्रसामुग्री याची साक्ष देतात. आर्थिक सहकारी संस्था या तर निव्वळ आर्थिकच व्यवहार करत असल्यामुळे आर्थिक गैरप्रकार सहजसोपा असतो.

एका ताज्या अहवालातून महाराष्ट्रात गेल्या पाचच वर्षांत ६० नागरी सहकारी बँका बुडाल्या आहेत. या बँका नुसत्या स्वत:च बुडाल्या असल्या तर एकवेळ खपूनही गेले असते. पण साऱ्या बँकांनी लाखो लोकांचे काही हजार कोटी रुपये बुडवून टाकले आहेत. सहकाराची कशीही का असेना मोठी परंपरा असलेल्या महाराष्ट्रात २०२४ मध्ये ४९६ नागरी बँका कार्यरत होत्या. एप्रिल २०१९ ते मार्च २०२४ या पाच वर्षांत ६० हून अधिक नागरी सहकारी बँकांचा परवाना रद्द केला गेला. त्यापैकी काही बँकांचे दुसऱ्या बँकेत विलीनीकरण झाले, पण त्या नामशेष झाल्याच. विलीनीकरण झालेल्या बँका, त्यांचे कर्मचारी, खातेदार यांची स्थिती जरा बरी असते. नोकऱ्या, ठेवी सुरक्षित असतात. पण विलीनीकरण झालेल्यांच्या तुलनेत पूर्णपणे बुडालेल्या बँकांची संख्या खूपच जास्त असते. त्यामुळे रस्त्यावर आलेले, नोकऱ्या गमावलेले कर्मचारी, ठेवींचे पैसे अडकलेले ठेवीदार खूप मोठ्या संख्येत असतात. सध्या एक बरे आहे, त्यातल्या त्यात. नागरी सहकारी बँकेतील ५ लाखांपर्यंतच्या ठेवी सुरक्षित असतात. ठेव विमा आणि पत हमी महामंडळ बँकांकडून विमा रक्कम घेऊन ५ लाखांपर्यंतच्या ठेवींची हमी घेते. यामुळे ५ लाखांपर्यंतचे म्हणजेच लहान ठेवीदार सुरक्षित राहतात. ५ लाखांच्या वरचे ठेवीदार फार मोठे नाहीत तरी त्यांच्यापेक्षा बरे असतात. त्यातही त्यांचे ५ लाख निघालेलेच असतात. अर्थात, निवृत्तीनंतरची मोठी रक्कम गुंतवून मोठीच शेकून घेतलेले अशा बुडित बँकांचे ठेवीदार आजूबाजूला दिसत असतातच.

पाच वर्षांत ६० नागरी बँका बंद पडल्या, संपून गेल्या. तशीच काहीशी स्थिती महाराष्ट्रातील पतसंस्थांची आहे. आपल्या राज्यात जशा ४९६ नागरी बँका, तशाच १६००० पतसंस्था आहेत. आकड्यांच्या या फरकाच्या तुलनेत बुडणाऱ्या पतसंस्थाही त्याच्या चौपट म्हणजे २००८ असल्याचा अहवाल आहे. जसा बँक बुडण्यामुळे ठेवीदारांचा जीव टांगणीला लागला, तसेच पतसंस्थांचेही आहे. वेगळ्या अर्थाने 'चौपट' झालेल्या या संख्येनेही चौपट असलेल्या पतसंस्थांचे भरडले जाणारे ठेवीदारही चौपटच आहेत. महाराष्ट्रात नऊ महसुली विभाग आहेत. त्यात नाशिक विभागातील सहकारी धेंडांनी ४३७ पतसंस्था बुडवून टाकून यात 'अव्वल' स्थान पटकावले आहे. दुसरा 'मान' ३१६ पतसंस्था बुडवून कोल्हापूर विभागाने मिळवला आहे. त्यानंतर पुणे २१३, लातूर २११, मुंबई १८९, अमरावती १७६, छत्रपती संभाजीनगर १६३, कोकण १६१ यांनी अशा क्रमाने पतसंस्था नामशेष करून टाकल्या आहेत. सर्वांत विशेष म्हणजे यातही आपल्या नागपूर विभागाने फक्त १४२ पतसंस्थांना बुडवून सर्वांत शेवटचे कौतुकास्पद स्थान मिळवले आहे. जिल्हानिहाय पाहिल्यास १७४ पतसंस्था 'बुडवून टाकण्याचे श्रेय' एकट्या जळगाव जिल्ह्याने घेतले आहे. त्या खालोखाल कोल्हापूर १५८, सोलापूर ११६ आणि छत्रपती संभाजीनगर १०२ या तीन जिल्ह्यांनी 'शतकी' खेळी खेळली आहे. यातही नागपूर जिल्ह्याने एकही पतसंस्था बुडू दिलेली नाही, हेही विशेष. या साऱ्या बुडलेल्या, विशेषत: मस्तवाल, भ्रष्ट संचालक व अधिकारी किती सर्वसामान्य लोकांचे, किती पैसे खाल्ले आणि किती बुडवले हा हिशेब करणाऱ्या यंत्रणासुद्धा थकून गेल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील 'आदर्श' या एकाच पतसंस्थेने २४ हजार ठेवीदारांचे २०२ कोटी रुपये जवळजवळ बुडवूनच टाकले आहेत. आता आपण करत बसू या बुडलेल्या पतसंस्था, गुणिले ठेवीदार, गुणिले ठेवींची रक्कम वगैरे. इतकेच तर आहे आपल्या हातात..!

९८८१७१७८२९

---

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# डॉ. आंबेडकर यांचा तरुणांना संदेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समस्त भारतीयांचे आदराचे, श्रद्धेचे व प्रेरणेचे केंद्र आहे. त्यांचे जीवन, त्यांच्या व्यक्तिगत जीवनात त्यांनी खाल्लेल्या खस्ता, दिलेला लढा, प्राप्त केलेले यश या सर्वच गोष्टी अभ्यासनीय आहेत. आयुष्यभर त्यांना टीका, टिप्पणी, निंदा यांचा सामना करावा लागला. कधी त्यांच्या जातीवरून त्यांची थट्टा उडविली गेली तर कधी त्यांच्या गरिबीवरून, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर कधीही डगमगले नाहीत. त्यांना माहीत होते की, केवळ शिक्षणच त्यांना इतरांच्या बरोबरीमध्ये येण्याचा अधिकार देऊ शकते. यावरून विद्यार्थ्यांनी हा संदेश घेतला पाहिजे की त्यांनी आपला मार्ग सोडू नये. टीका, टिपणी आणि हतोत्साहित करणारे प्रसंग यांना हसत हसत सामोरे गेले पाहिजे.

आज जवळपास सगळ्यांच्या जवळ स्वतःची पुस्तके असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याजवळ स्वतःची पुस्तके नसायची. त्यामुळे वाचनालयात जाऊन पुस्तके वाचणे, त्याचे नोट्स काढणे व परीक्षेची तयारी करणे हे त्यांच्या हातात होते. यासाठी त्यांनी कधीही कंटाळा केला नाही. अगदी अल्प अशी झोप घेऊन उर्वरित सर्व वेळ ते अभ्यासामध्ये खर्च करायचे. आज आपल्याला माहीत आहे की आजचा तरुण हा टीव्ही, मोबाईल, समाज माध्यमांमध्ये गुरफटलेला आहे. आपला अधिकाधिक वेळ अभ्यासासाठी खर्च करून यश प्राप्त करून घेणे हेच विद्यार्थ्यांचे परम कर्तव्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातून हा संदेश आम्ही घेतला पाहिजे.

एकदा तरुण वकिलांच्या समोर बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, न्यायाधीश माझे मित्र आहे, त्यांच्याशी माझे संबंध आहे असे समजून खटल्याची तयारी न करणे हा वकील म्हणून अक्षम्य अपराध आहे. आपण आपल्या खटल्याची उत्तम तयारी करूनच आपले मत मांडले पाहिजे. आजकाल प्रत्येकच विद्यार्थ्याला इंटरव्ह्यू म्हणजे मुलाखत ही नोकरीसाठी द्यावीच लागते. अनेक वेळा मुलाखतीच्या आधी विद्यार्थ्यांची तयारी त्यासाठी नसते. परिणामी त्यांना अपयश येते. प्रत्येकाने आपल्या नोकरी, व्यवसायासाठी आवश्यक ती तयारी करूनच त्याला सामोरे गेले पाहिजे हा संदेश यावरून आपल्याला मिळतो.



१९४६ साली मुंबईतल्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात ते म्हणतात की, आपल्या देशामध्ये एका विशिष्ट कालखंडात न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, फिरोजशहा मेथा आदींनी आपल्या विद्यार्थी जीवनात तन्मयतेने केलेल्या अध्ययनामुळे एक उत्तुंग आदर्श प्रस्थापित केलेला होता. परंतु आजचा विद्यार्थी हा सहज सुलभ कामात आनंद मानू लागलेला आहे. अनुशासन, समर्पित वृत्ती याचा अभाव उत्तरोत्तर वाढू लागलेला आहे. सत्य शोधण्यासाठी तन्मयतेची नितांत आवश्यकता आहे. प्रसंगी सत्ताधीशांशी संघर्षही करावा लागू शकतो. सत्याचा शोध हाच आपला धर्म आहे. यावरून विद्यार्थ्यांनी असा बोध घेतला पाहिजे की यशासाठी शॉर्टकट मारण्याची प्रवृत्ती आपण त्यागली पाहिजे.

तरुण शिक्षकांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, आपण आयुष्य ऐषोआरामात घालविण्यात आनंद मानू नये. गाईड आणि शॉर्ट नोट लिहून पैसा कमवणे व मौजमजा करणे याला आपला धर्म मानू नये. अध्ययन, अध्यापन आणि संशोधन प्रत्येक प्राध्यापकाचे जीवनकार्य बनले पाहिजे. शिक्षक स्वतः विद्वान असले पाहिजेत. त्यांची वाणी शुद्ध असली पाहिजे. ज्ञानाचे त्यांच्याजवळ भंडार असले पाहिजे व एखादा जटिल विषयही रंजक स्वरूपात विद्यार्थ्यांना शिकविता आला पाहिजे.

ज्ञान, शील, विनय या डॉ. आंबेडकरांच्या अंगी असलेल्या गुणांचा त्यांनी दलितांच्या सेवेकरिता उपयोग केला. युवकांना ते म्हणतात, माझ्या आयुष्यात मी कधीही कोणासमोर लाचार झालो नाही. जीवनाच्या प्रारंभीच मी माझ्या आयुष्याची दिशा निश्चित केली. स्वतःच्या पायावर मी उभा राहिलोच पण केवळ पैशाच्या मागे न लागता जनसेवेसाठी जास्तीत जास्त वेळ देईल असा विचारही लहानपणीच मी केला होता आणि आयुष्यात या विचारापासून मी कधीही स्वतःला ढळू दिले नाही. विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या गुणांचा समाजाच्या सेवेसाठी उपयोग करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

एका प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मी आजवर कोणाची फसवणूक केली नाही. मला ना दारूबद्दल आकर्षण आहे ना विडी, सिगारेटबद्दल. परंतु आजचा युवक हा विविध प्रकारच्या व्यसनांच्या अधीन झालेला आपल्याला दिसतो. उपभोगात रममाण होऊ पाहणारा ध्येयहीन युवक स्वतःचे इमान सहजगत्या विकू शकतो. जीवनामध्ये अनेक वेळा बाबासाहेबांनी सार्वजनिक निधी जमवलेला होता. परंतु त्यातील एकाही पैशाचा उपयोग त्यांनी स्वतःच्या कामासाठी केला नाही. यावरून तरुणांनी हे लक्षात घेतले पाहिजे की विविध प्रकारचे सामाजिक उत्सव आणि कार्यक्रम करताना आपण निधी उभा करतो. परंतु जनतेचा आपल्यावर विश्वास राहिला पाहिजे यासाठी त्या निधीचा योग्य विनियोग आपण केला पाहिजे आणि त्याचा हिशेबसुद्धा आपल्याला कधीही सादर करता येण्यासारखा असला पाहिजे. दलित विद्यार्थ्यांसमोर बोलताना ते म्हणतात की, आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लगेच नोकरी करून दलित विद्यार्थी आपल्या संसारात रममाण होतात. परंतु शिक्षित झालेल्या दलितांनी आपल्या अशिक्षित, अडाणी बांधवांची काळजी केली पाहिजे. दलित समाजाच्या प्रगतीसाठी ध्येयवादी युवक कार्यकर्त्यांची गरज आहे. हा संदेश सर्व समाजातील सर्वच तरुणांना लागू पडणारा आहे.

निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात की, आजकाल निवडणुकांमध्ये तरुण लोक मोठा रस घेतात. परंतु निवडणूक संपल्याबरोबर ते निष्क्रिय होऊन जातात. वास्तविक पाहता राजकारणा व्यतिरिक्त समाज जीवनाची अनेक क्षेत्रे अशी आहेत की जेथे आपल्यापैकी प्रत्येकाने गेले पाहिजे व तेथे काम केले पाहिजे. हारतुरे घालणे, आमदार, खासदार बनणे याच्या व्यतिरिक्त सुद्धा करण्यासारखी बरीच कामे आहेत, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. डॉ. आंबेडकरांचे जीवन हे एका राष्ट्रभक्त व्यक्तीचे जीवन होते. त्यांच्या जीवनावरून आपणही बोध घ्यावा व कोणाचीही जात न बघता जे गरजू पीडित, शोषित आहेत अशा सर्वांसाठीच काम करण्याचा संकल्प करावा असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

---

## पालकमंत्र्यांच्या आदेशाचे पालन करावे

नागपूर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी शहरातील कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी नादुरुस्त ३५०० कॅमेरे त्वरित सुरू करण्यासाठी कार्यपालिका आणि पोलिस प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सूचना केल्या आहेत. पालकमंत्र्यांनी या प्रशासकीय दोन्ही विभागातून कार्यक्षम व तत्परतेने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदारी देऊन हा प्रश्न मार्गी लावावा. बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम जोपर्यंत सोपवत नाही तोपर्यंत असेच सुरू राहणार. लोकांच्या पैशाचा विनियोग अशाच पद्धतीने होत आला आहे. शासन कार्यपद्धती बदलली आहे, पारदर्शकता आली आहे हे चित्र दिसायला पाहिजे. अनेक चौकांत सिग्नल लागले आहेत, काही ठिकाणी वेळ दर्शविणारे डिजिटल घड्याळे आहेत. नागपुरातील बाहेरच्या रिंग रोडवरील चौकात आजूबाजूच्या रहिवासी वस्त्यांमधून दुचाकी/चारचाकी वाहतूक ही मुख्य रस्त्याच्या तुलनेत कमी असते. मात्र थांबण्याची वेळ ही सारखीच दाखविली जाते. त्यामुळे मुख्य चौकात थांबणारा दचाकी/चारचाकी वाहक हा आधीच अधीर झालेला असतो. तो डावी-उजवीकडे पाहून लाल दिवा असताना आपले वाहन पुढे दामटतो. त्याला पाहून इतरही वाहने निघतात. थांबतात फक्त ज्यांना नियमानुसार वाहूक करायची आहे ते. त्यांचा भ्रमनिरास होतो. मनोमनी ते प्रशासनावर राग करतात आणि पुढे निघतात. प्रशासनाने वाहतुकीचा अंदाज घेऊन सिग्नल घड्याळाच्या वेळेचे निर्धारण नव्याने करावे. सर्व सिग्नलवर घड्याळे बसविण्यात यावी, बंद झालेली दुरुस्त करावी आणि झोनप्रमाणे अधिकाऱ्यांना जबाबदारी द्यावी. दर तीन महिन्यांनी निरीक्षण करून उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावा. या कार्यात हयगय, कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्याला कडक शासन करावे.

**संजय पाठक**/नागपूर

●● ●●

## तहव्वूरच्या चौकशीत याचा खुलासा होईल काय?

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रयत्नांमुळे अतिरेकी तहव्वूर हुसेन राणा आता भारताच्या कोठडीत आहे. मंबईच्या २००८ च्या

## वाचक पत्रे

२६/११ हल्ल्याविषयी अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. त्या हल्ल्याच्या वेळी भारताचे परराष्ट्र मंत्रालयाचे मोठे अधिकारी पाकिस्तानच्या 'मनाली लुमा' या हिल स्टेशनमध्ये मौजमजा का करीत होते? गृहमंत्री शिवराज पाटील यांनी कमांडोंबरोबर दिल्लीहून मुंबईला यायला उशीर कां केला? दिग्विजयसिंह, महेश भट्ट इ. काँग्रेस नेत्यांनी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला २६/११ हल्ल्यासाठी जबाबदार सिद्ध करण्यासाठी केवळ सहा दिवसांत पुस्तक कसे प्रसिद्ध केले. हल्लेखोरांना हिंदू दर्शविण्यासाठी त्यांच्या उजव्या हाताला लाल धागा बांधण्याची कल्पना कुणाची? या हल्ल्याच्या काही महिने अगोदर राहुल गांधी, पी. चिदम्बरम्, सुशीलकुमार शिंदे यांनी 'भगवा आतंकवाद' ही कल्पना का पसरवायला सुरू केली? समझौता एक्सप्रेस, मालेगाव बॉम्बस्फोट हे घडवून 'हिंदू टेरर'च्या नावाखाली कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञा यांचा तुरुंगात अनन्वित छळ करण्याची कल्पना कुणाची? इत्यादी अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे आता मिळवायला पाहिजेत. या कटाचा तहव्वर राणा हा एक महत्त्वाचा भाग आहे. २६/११ कटाच्या पाच दिवस अगोदर तहव्वूर राणा भारतातून पसार झाला. त्याअगोदर अतिरेक्यांना हिंदू दाखवणारी आवश्यक कागदपत्रे तयार करायला व कटाला 'फिनिशिंग टच' द्यायला वगैरे भारतातच ठाण मांडून होता. काँग्रेस व संपुआ सरकारने हिंदू आतंकवाद सिद्ध करण्यासाठी मुंबई २६/११ कटाची जय्यत तयारी केली होती. पण मुंबईच्या तुकाराम ओंबले या पोलिस हवालदाराच्या सतर्कतेमुळे कसाब अतिरेकी जिवंत पकडला गेला व हिंदू आतंकवाद सिद्ध करण्याचा काँग्रेसचा कट फसला. ओंबले यांना झटापटीत हौतात्म्य प्राप्त झाले. त्याची किंमत आता काँग्रेसला मोजावी लागेल. तहव्वूर राणाची या सर्व बाबतीत कसून चौकशी होणारच, यात शंका नाही, पण यात दोषी आढळलेल्या देशद्रोही भारतीयांना कठोर शिक्षा व्हायलाच पाहिजे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

## मे महिन्यात शाळा कशासाठी?

मे महिन्यात विदर्भात सूर्य अक्षरशः आग ओकत असतो. दपारच्या वेळी तर घराच्या बाहेर पडणे अशक्य असते. अशा वेळी काही सीबीएसई शाळा मे महिन्यात शाळा चालू ठेवण्याचा विचार करीत आहे.

अशा शाळेतील मुख्याध्यापक, इतर शिक्षकवर्ग यांना अक्कल आहे की नाही? मुलांची प्रकृती बिघडेल असे हे लोक का वागत आहे अचानक? मे महिन्यापर्यंत परीक्षा ठेवून या अतिशहाण्या लोकांना काय साध्य करायचे आहे? शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करणे जमत नाही, म्हणून हा सगळा तमाशा आहे का?

उन्हाचा त्रास मात्र मुलांना भोगावा लागतो. शासनाने अशा शाळांवर त्वरित कारवाई करावी, जेणेकरून लहान मुलांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होणार नाही. जरा मुलांच्या तब्येतीकडे लक्ष द्यावे. अन्यथा अशा बोगस शाळा बंद कराव्या.

**अपर्णा अग्निहोत्री**/८९५५१६४१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाभरात महामानवाला विनम्र अभिवादन










(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ एप्रिल**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार दि.१४ एप्रिल रोजी जिल्ह्यात ठिकठिकाणी विनम्र अभिवादन करण्यात आले. बीड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी आ.संदिप क्षीरसागर, मनोज जरांगे पाटील, पप्पू कागदे, सचिन मुळूक, माजी आ.सय्यद सलिम, अजय सवाई, माजी आ.जनार्दन तुपे, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, प्रा.सुशीलाताई मोराळे, हेमंत क्षीरसागर, चंद्रकांत नवले, ॲड.महेश धांडे, मनोज जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बीड येथे अभिवादनासाठी जनसागर लोटला आहे.

भारतीय बौद्ध महासभेच्या रथासह शहरातील विविध बौध्द विहाराच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक, बलभीम चौक, माळीवेस मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत अभिवादन रॅली काढण्यात आली. उपस्थित जनसमुदायाला त्रिशरण, पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहर रोषणाईने नटले आहे. शहरातील विविध ठिकाणच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून आपापल्या भागामध्ये निळे झेंडे, विद्युत रोषणाई, पताके, आदी सजावट करून शहराच्या सौंदर्यात भर टाकली होती. बीड शहरात महिला-पुरूषांसह भिमसैनिकांनी पेठ बीडमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले.

दरम्यान जिल्ह्यातही ठिकठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण स्फुर्तीदायक बनले होते. बीड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये सकाळपासूनच भिमसैनिक निळे ध्वज हाती घेवून अभिवादनासाठी दाखल झाले. डॉ.आंबेडकर जयंती निमित्त आज शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी ध्वजवंदनही करण्यात आले. अभिवादनासाठी हातामध्ये निळा ध्वज घेवून सर्वजण सहभागी झाले होते.बीड येथील डॉ.आंबेडकरांच्या पुर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## बीडमधील सावरकर स्मारकाचे सुशोभीकरण अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ एप्रिल**

शहरातील जवाहर कॉलनी परिसरात उभारण्यात येत असलेल्या स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या स्मारकाच्या सुशोभीकरणाचे व डोम उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या काही दिवसांत हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी रविवारी (दि.१३) स्मारकाला भेट देऊन कामाची पाहणी केली. त्यांनी कामाच्या दर्जाचे कौतुक केले असून, सावरकर प्रेमींनीही या गुणवत्तापूर्ण कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे.स्मारकाचे रूप अधिक भव्य आणि प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास सावरकर विचारधारेच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. पाहणीप्रसंगी माजी नगरसेवक सुभाष सपकाळ, संपादक दिलीप खिस्ती, वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.अजिंक्य पांडव, ॲड. मिलिंद वाघिरकर, कुलदीप धुमाळे, डॉ.राजेश भुसारी, प्रा.अभय पटवारी, डॉ.सुहास देशपांडे, डॉ.प्रसाद वाघीरकर, प्रा.मिलिंद शिवणिकर, डॉ.अजय कुलकर्णी, सतिश देशपांडे, त्रिंबक देशपांडे, डॉ.यु.डी.कुलकर्णी, महेश कुलकर्णी, प्रकाश गोरकर, विजय कोटुळे, विशाल जोशी, प्रा.उमेश बोबडे, अंकित जोशी, अनिल जोशी, अभिजित वैद्य, दिलीप जवळीकर, गोविंद शिवणीकर आदी मान्यवर व सावरकरप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ एप्रिल**



बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमाप्रसंगी श्रीमती मनीषा ताई कुलकर्णी यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे रांगोळी स्वरूपात उत्कृष्ट रेखाटन केल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. बीएस्सी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. अश्विनी मस्कर व कु. प्रतीक्षा जोशी यांनी भारतीय संविधान या विषयावर भित्तिपत्रिका तयार केली. भित्तीपत्रकाचे विमोचन मान्यवराच्या उपस्थित करण्यात आले. व्यासपीठावर डॉ.रूपाली कुलकर्णी, डॉ रमेश खंडागळे, प्रा. राम गव्हाणे, डॉ. प्रशांत तालखेडकर, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे यांनी केले. कार्यक्रमाधिकारी डॉ.सुहास जोशी,डॉ. संगीता ससाने महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक, प्राध्यापिका विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## अनिल राधे मित्र मंडळाच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ एप्रिल**

येथील अनिल राधे कांबळे मित्र मंडळाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मोहन जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी नितीन नाईकनवरे हे होते. यावेळी जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, राजेश घोडे, संतोष यादव, भास्कर शिंदे, धम्मानंद साळवे, अमोल शेरकर, दत्ता कांबळे, विठ्ठल तुपसौंदर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत, शरद यादव, पापा सोळंके, शरद यादव, प्रल्हाद दळवी, कचरू कांबळे, बबन खंडागळे, सरपंच नारायण भले यांचे सह भिमभक्त उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी दशरथ कांबळे, बाबासाहेब कांबळे, भानुदास कांबळे, संतोष कांबळे, विठ्ठल कांबळे, सुरज कांबळे, युवराज कांबळे, आदित्य वाघमारे, विलास लोंढे, मयूर कांबळे, दत्ता कांबळे, विक्रम कांबळे, श्याम कांबळे, संकेत कांबळे, अविनाश कांबळे, प्रशांत कांबळे, प्रदीप कांबळे, बाळू कांबळे, अरविंद लोखंडे, नागेश कांबळे, आदेश वावळे, सागर कांबळे यांनी परिश्रम घेतले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बक्षीस वितरण संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१४ एप्रिल**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अभ्यासिका, परळीवेस, अंबाजोगाई येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाले.

श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, साहित्य निकेतन ग्रंथालय व सेवाभारती, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अभ्यासिका,परळी वेस येथे १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विध्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ व थोर महामानव डॉ.आंबेडकर यांना अभिवादन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विजयराव वालवडकर (अध्यक्ष, स्थानिक व्य. मंडळ,खो. शै.संकुल अंबाजोगाई), प्रमुख उपस्थिती उन्मेष दादा मातेकर (अध्यक्ष, शालेय समिती,खो. प्रा. वि. अं. ), विशेष उपस्थिती दत्तप्रसादजी रांडद (अध्यक्ष, साहित्यकेतन ग्रंथालय, अं.) संजय जोगदंड( संपादक, लोकमान्य न्यूज ), कौस्तुभ दादा कोदरकर ( जिल्हा कार्यवाह, सेवा भारती ), नागनाथ आप्पा जोगदंड (माजी नगरसेवक ), सामाजिक कार्यकर्ते दिलीप लोंढे,मल्हारी जोगदंड, रवींद्र जोगदंड,लखन जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे सर, विभाग प्रमुख श्रीधर चौरे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचा उद्देश प्रास्ताविक रूपात कौस्तुभदादा कोदरकर यांनी स्पष्ट केला. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन रोहित कुलकर्णी यांनी केले. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविधस्पर्धेतील १६ गुणवंत विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अभ्यासकेतील ५५ विद्यार्थी, स्थानिकमहिला पुरुष उपस्थित होते.मनोज बरुरे व चव्हाण राजेश यांनी डॉ.आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित माहिती सांगितली.संजय जोगदंड यांनी अभ्यासिका नियमित सुरू असल्याने ती विद्यार्थ्यांना प्रेरक ठरत असल्याचे सांगितले.उन्मेष दादा मातेकर यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित स्वयंम रचित कविता म्हटली. विजयराव वालवडकर यांनी अध्यक्षीय समारोपात प्रतिकूल परिस्थितीत डॉ. आंबेडकर सिम्बॉल ऑफ नॉलेज कसे झाले हे सांगताना, ही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ प्रमाणे निरंतर सुरू राहील असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभ्यासिका प्रमुख किशन गायकवाड यांनी केले, वैयक्तीकपद्द गायत्री संदिकर यांनी म्हटले.आभार श्रीधर चौरे यांनी मानले.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ.व्ही.के. पाटील शैक्षणिक संकुलात डॉ. आंबेडकर अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**
ब्रिटिश भारताचे मजूर मंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धम्मचे पुनरुज्जीवकभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, एस.पी. पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमरसिंह कवडे, बी.एड. कॉलेजचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, एम. फार्मसीचे विभाग प्रमुख डॉ.गणेश मते, वेलनेस फिजिओथेरपी कॉलेजचे विभाग प्रमुख डॉ. गणेश गोरे, आयटीआय कॉलेजचे व्यवस्थापक प्रा. दत्तात्रय घावटे तसेच संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बाबासाहेबांना अभिवादन...



### बहूजन योध्दा सामाजिक संघटना

**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**
भारतरत्न, संविधाननिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध जाती धर्मातील पदाधिकारी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या निमित्ताने संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे, मुकुंद घुले, विशाल शिंगाडे, पप्पू मुंडे, सुरेश गवळी, अनिरुध्द कावळे यांच्या समवेत विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होत बाबासाहेबांचे कार्य आणि विचार जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला. शोषित, वंचित, दलित, गरीब, श्रमिक वर्गाला न्याय मिळवून देणाऱ्या आणि एक नवभारत घडविण्याचं स्वप्न पाहणाऱ्या या महामानवाच्या विचारांची आज अधिक गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



### जिल्हा परिषद शाळा, जळकोट

**जळकोट, दि.१४ एप्रिल -**
बोधिसत्व विश्वरत्न, दलितांचे कैवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जिल्हा परिषद प्रशाला, जळकोट येथे साजरी करण्यात आली. प्रशालेचे मुख्याध्यापक पी.एल. तरमोडे व विस्तार अधिकारी एस.एस. कदम यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. समृद्धी कदम, एस.एस. कदम, डॉ.एम.एस. जाधव, महादेव माने, पुष्पलता कांबळे या सर्वांनी बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र, शैक्षणिक, सामाजिक कार्य व जीवनातील प्रसंग सांगितले. संतोष सारणे, जयराम शिंदे, समाधान पवार, संजय स्वामी या सर्वांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुष्पलता कांबळे यांनी केले तर सर्वांचे आभार संतोष सारणे यांनी मानले.



### धाराशिव प्रशाला, धाराशिव

**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**
धाराशिव प्रशाला धाराशिव येथे विश्वरत्न,बोधिसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मांडले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक पंडित जाधव स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अरुण माडेकर यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी मोहन सुरवसे, बाळासाहेब इसाके, जयश्री भोसले, मीना गव्हाणे, दिपाली रोकडे, रामेश्वर चव्हाण, सज्जन करळे, तानाजी आदटराव, पांडूरग देशमुख, निलावती झोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रमण जाधव यांनी केले.



### जि.प. शाळा माळकरांजा

**कळंब, दि.१४ एप्रिल -**
तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळकरंजा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे विश्वरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी गावातील ग्रामस्थ तसेच गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच विजय शिंदे, उपसरपंच तथा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद गालट यांच्यासह गावकरी उपस्थित होते.



### आलियाबाद ग्राम पंचायत

**जळकोट, दि.१४ एप्रिल -**
तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथे ग्रामपंचायत कार्यालयात घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रकाश चव्हाण, सुर्यकांत चव्हाण, अमृता चव्हाण, माणिकराव चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, विनायक चव्हाण, हरिदास राठोड, शिवाजी चव्हाण, मोतीराम राठोड, संतोष राठोड, संजय राठोड, सुभाष चव्हाण, संदीप राठोड,बाबु जाधव , मनोज पवार यांच्यासह ग्रामस्थ संख्येने उपस्थित होते.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारत देशाची खुप मोठी प्रेरणा आहे

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ एप्रिल -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा प्रभाव प्रत्येक घरापर्यंत पोहचविण्याचे प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे या देशाची खुप मोठी प्रेरणा आहे. त्यामुळे सर्व नागरीकानी बाबासाहेब वाचला पाहिजे तेव्हाचकळतात बाबासाहेब, असे परखड मत तुळजापुर तालुक्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले. नळदुर्ग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने अभिवादन करण्यासाठी आपले मत व्यक्त करताना बोलत होते.

यावेळी नळदुर्ग पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक नंदकिशोर सोळुंके, शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिंदे गट ज्ञानेश्वर घोडके, कुलस्वामीनी बोअरचे मुख्य प्रवर्तक चंद्रकांत बनसोडे, विलास येडगे, संजय जाधव, सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे, भाजपाचे सुशांत भुमकर, शहराध्यक्ष धिमाजी घुगे, श्रमीक पोतदार, निरंजन राठोड, बबन चौधरी अदिजन उपस्थित होते.



यावेळी नळदुर्ग शहरात विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बौद्ध विहारापासुन समतेचा संदेश देत लहान मुलासह मोटार सायकल रॅली काढण्यात आली व बसस्थनका समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात फटाक्यांची आतषबाजी करत जयजयकार करण्यात आला. इंदिरानगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुलचे मुख्य प्रवर्तक मारुती खारवे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

जी.एम. चौकात सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. तर डॉ. आंबेडकर चौकात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच पुजन करून यावेळी सर्वांना बौध्दाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी त्रिशण पंचशिल दिले. आभार दादासाहेब बनसोडे यांनी मानले.

## आदर्श शिक्षक पुरस्कार लेकीचा वडिलांकडून सोने घालून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१४ एप्रिल -**
पार्वती कन्या प्रशाला, जळकोटच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम यांना अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला व कोल्हापूर जिल्हा सानेगुरुजी कथामाला यांच्या संयुक्त विद्यमाने ५७ व्या अधिवेशनामध्ये कोल्हापूर येथे राष्ट्रीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार २०२५ देऊन सत्कार करण्यात आला.

याचे औचित्य साधून आपल्या मुलीने शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आई-वडिलांना अतिशय आनंद झाला. म्हणून वडिलांनी सोलापूर येथे भरती आहेर करून व अर्धा तोळ्याची सोन्याची अंगठी घालून लेकीचा वडील जयेंद्र सोमवंशी यांनी सत्कार केला. यावेळेस आई शांताबाई सोमवंशी, सचिन सोमवंशी, नीता सोमवंशी, नितीन सोमवंशी, मंजुषा सोमवंशी, प्रवीण सोमवंशी, पूजा सोमवंशी तसेच तनिष्का सोमवंशी, स्वरा सोमवंशी, श्रुती सोमवंशी, शौर्य सोमवंशी, शिव सोमवंशी परिवारासह सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास अभिमन्यू कदम, प्रा. अक्षय कदम, वैष्णवी कदम, आशिष कदम कार्यक्रमास उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आ. राणादादांकडून अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त तुळजापूर विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, माजी नगरसेवक पंडितराव जगदाळे, शांताराम पेंदे, तानाजी कदम, प्रकाश मगर, दिनेश बागल, सागर कदम यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बुद्ध अनुयायी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने धम्म ज्ञान स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१४ एप्रिल -**
भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बोधिसत्व धम्म ज्ञान स्पर्धा घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

हायस्कूल लोहारा येथे रविवारी (दि.१३) रोजी ही स्पर्धा घेण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय व राज्य कार्यकारिणीच्या आदेशानुसार राज्यस्तरीय बोधिसत्व धम्मज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पाचवी ते सातवी गटातील २० व मोठ्या गटातील २० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी तानाजी माटे यांनी केंद्रप्रमुख म्हणून काम पाहिले. तर सुधाकर गायकवाड व दीपक सोनकांबळे यांनी पर्यवेक्षकाचे काम पाहिले.

यावेळी प्रा.डॉ. विनोद आचार्य, बाळासाहेब खरोसे, रत्नदीप मस्के, प्रशांत भंडारे, अंकुश भंडारे, आम्रपाली गोतसुर्वे, सिता सोनवणे, रमाबाई गायकवाड, आर्यन भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

## परंडा भाजपातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ एप्रिल -**
भारतीय जनता पार्टीच्या वतीने परंडा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रतिवर्षीप्रमाणे भारतीय संविधानाचे शिल्पकार, बोधीसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून व बुध्द वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. प्रतापसिंह पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, सुखदेव टोंपे, विकास कुलकर्णी, उमाकांत गोरे, अविनाश विधाते, सुबोधसिंह ठाकूर, युवा नेते समरजीतसिंह ठाकूर, हनुमंत पाटील, डॉ. आनंद मोरे, ॲड. तानाजी वाघमारे, रामकृष्ण घोडके, धनाजी गायकवाड, साहेबराव पाडुळे, डॉ. अमोल गोफणे, परसराम कोळी, विठोबा मदने, शिवाजी पाटील, आप्पासाहेब शिंदे, तु.दा. गंगावणे, प्रा.डॉ. शहाजी चंदनशिवे, धनंजय काळे, गौरव पाटील, मनोहर पवार, मिलिंद शिंदे, निर्मलकुमार गांधले, आदर्श ठाकूर, सुरज काळे, अमर ठाकूर, किशोर वाघमारे, सिध्दीक हन्नुरे, हिमालय वाघमारे यांच्यासह परंडा शहरातील व तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जयप्रकाश विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**रूईभर, दि.१४ एप्रिल -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफल अर्पण करण्यात आले. भारतीय संविधानाचे वाचन कुमार आयुष किरदत यांने केले. विद्यालयातील सहशिक्षक आकाडे ए.जे. यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थाध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्रशासकिय अधिकारी शिवकन्या सांळुके, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक डोंगरे काकासाहेब, प्राचार्य संतोष कपाळे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अभिजित घोळवे यांनी मानले.

## डीबीए समूहाच्या वतीने डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंतीनिमित्त डीबीए समूहच्या वतीने परंडा येथील आठवडा बाजार चौकामध्ये जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रतिमेचे पूजन माजी नगराध्यक्ष जाकीरभाई सौदागर, सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी राहुल बनसोडे, वंचित बहुजन आघाडी मोहन बनसोडे, शहाजी चंदनशिवे, डी.बी.ए. समूह संस्थापक अध्यक्ष दयानंद बनसोडे, या सर्वांनी सामुदायिक भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी ध्वजारोहण त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी गुणवत्ता होतकरू शाळेच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग गणवेश व वह्या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. तसेच निराधार महिलांना साडी वाटप केले व विद्यार्थ्यांचे भाषण झाली. द्रावण भीम नगर युवतीने व विद्यार्थ्यांनी 'विद्रोही मशाल' हे नाटक सादर केले.

यावेळी दयानंद धेडे, अमर गायकवाड, हनुमंत पाटील, दीपक गायकवाड, राजभाऊ शिंदे, गंगावणे, आरती बनसोडे, कल्पना बनसोडे, सुषमा बनसोडे उपस्थित होते.

## संविधान एक दस्तऐवज नव्हे तर तो जीवनशैली आहे : समिक्षा खारवे



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ एप्रिल -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिताना सर्व नागरीकांना समान अधिकार मिळतील याची काळजी घेतली आहे. त्यामुळे संविधान एक दस्तऐवज नव्हे तर तो जीवनशैली आहे, असे समीक्षा खारवे यांनी नळदुर्ग येथील इंदिरानगर येथे बी.आर. ग्रुपच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलतांना म्हटले.

दि.१४ एप्रिल रोजी संपुर्ण देशात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नळदुर्ग शहरातही शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्था, विविध संघटना व संस्थांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर घोडके, विलास येडगे, तानाजी जाधव, उत्तम बनजगोळे, सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड आदिजण उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसह महात्मा गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बी.आर. ग्रुपचे प्रमुख मारुती खारवे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.आर. ग्रुपचे अध्यक्ष पप्पु मस्के, उपाध्यक्ष रोहीत माने यांच्यासह बी.आर. ग्रुपचे सर्व पदाधिकाऱ्यांनी परीश्रम घेतले.







नांदेड- महामानव , विश्वरत्न, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनेतने सोमवारी सकाळपासुनच रेल्वे स्थानक परीसरातील डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ प्रचंड गर्दी केली होती. या प्रसंगी लहान बालक, अबाल वृद्धांनी मोठ्या आस्थेवाईकपणे डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. अभिवादनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी खा. अशोक चव्हाण, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिर्ल परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त महेश डोईफोडे आदीसह विविध राजकिय पक्षातील पदाधिकाऱ्यांनी यावेळी अभिवादन केले. दुपारी चार नंतर शहरातील विविध मार्गावरुन मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी प्रचंड घोषणाबाजी करत तरुणाई ढोल ताशा, डि.जे. चंया तालावर थिरकली. मिरवणुक मार्गावर ठिक ठिकाणी अनेक राजकीय पक्ष, संघटना, सेवाभावी संस्था तसेच वैयक्तिक अनेकांनी अन्नदान, पाणी वाटप, चणे वाटप केले. मिरवणुकीतील गर्दीमुळे शहरातील सर्व रस्ते उजळून गेले. मिरवणूकला रात्री उशिरापर्यंत परवानगी देण्यात आल्याने भिमसैनिकांचा उत्साह ओसंडुन वाहत होता. उशीरापर्यंत परवानगी असल्याने अनेक जयंती मंडळांनी मिरवणूक दुपारी चार नंतरच सुरू केल्या. मिरवणुकित जवळपास सर्वच जयंती मंडळांनी आकर्षक देखावे सादर केले. भीम जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते तर डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ विविध सामाजीक उपक्रम देखील राबविण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी विवेकानंद महाविद्यालय येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती साजरी

**मुक्रमाबाद** -मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल अंतर्गत दिनांक ११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार रज्जाक कुरेशी यांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक इनामदार हे होते व प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार रज्जाक कुरेशी व रामभाऊ खंकरे उपस्थित होते या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. मा.म.गायकवाड यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्यक्रम अधिकारी डॉ.आर.बी.मादळे यांनी केले सदर कार्यक्रमासाठी प्रा.बाळबुधे बी.डब्ल्यू., ग्रंथपाल डॉ. विलास पवार, प्रा.ए.व्ही.शिंदे,प्रा.एस.एल. बिरादार, बालाजी सादगिरे, यांच्यासह मोठ्या संख्येने महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते या कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.आर.बी.बाविस्कर यांनी मानले.

### टाकराळा बु. येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास प्रारंभ

**हिमायतनगर** -हिमायतनगर तालुक्यातील टाकराळा बु. येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास शनिवार ता. १२ पासून प्रारंभ झाला आहे. हा सप्ताह सोहळा शनिवार ता. १९ पर्यत चालणार आहे. या सप्ताह सोह्ळ्यात दररोज नित्य नियमाने सकाळी ४ ते ६ काकडा भजन हभप माऊली महाराज साखरा, हभप संतोष महाराज लौहरा हे सादर करीत आहेत. सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते १ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ, व तसेच रात्री ८ ते ११ हरि किर्तन होणार आहे. या मध्ये शनिवार ला हभप. शंकर महाराज पिंगळीकर, यांचे किर्तन संपन्न झाले. तर रविवार १३ हभप कपील महाराज कामारीकर, सोमवार ता. १४ वैष्णवी ताई देशमुख नवखेकर, मंगळवार ता.१५ हभप शैलेश महाराज देशमुख कामठेकर, बुधवार ता. १६ हपभ गोविंद महाराज पिंपळगाव सुकी, गुरुवार ता. १७ हपभ मारोती महाराज इंद्रवेलीकर, ता. १८ शुक्रवार हभप गोपीनाथ महाराज पावडेवाडीकर, यांचे किर्तन होणार असून शनिवार ता. १९ सकाळी १० ते १२ या वेळेत हभप. साध्वी मुक्ताई माऊली टाकराळा बु. नवीन मठ यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. व तसेच ज्ञानेश्वरी व्यासपीठ हपभ शिवाजी महाराज वडगावकर, भागवताचार्य हभप शैलेश महाराज देशमुख कामठेकर, गायक हभप भास्कर महाराज, माधव महाराज हिप्परगेकर, तबलावादक हभप तुकाराम महाराज येवलीकर, हभप गणेश महाराज पांचाळ, हभप दत्ता महाराज भद्रे येवलीकर, हभप शिवाजी महाराज येवलीकर, विनेकरी गुलाबराव गाढे, दशरथ कदम, व तसेच पारवा बु, येवली बसवन्ना, आनंदवाडी, कांडली बु., मोरगाव, वडगाव खू, सोमठाणा, दरेगाव आदिं गावांच्या भजनीं मंडळाचा विशेष सहभाग या सप्ताह सोहळ्यात राहणार आहे. महा प्रसादाने या भक्तीमय सोहळ्याची सांगता होणार आहे. सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन टाकराळा ग्रामवासियांनी केले आहे.

# जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा आज जिल्हाधिकाऱ्याच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड दि.१४ एप्रिल-**

पाणी व्यवस्थापनाची माहिती लोकांना व्हावी तसेच जलव्यवस्थापनाची मोठया प्रमाणात जनजागृती व्हावी यादृष्टीने राज्यात जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा शुभारंभ उद्या १५ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जलपुजनाने होणार आहे.

या जल व्यवस्थापन पंधरवड्यात १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात १५ एप्रिल रोजी जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते उदघाटन. १६ एप्रिल रोजी जलसंपदा विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण, १७ एप्रिल रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, जल पुनर्भरण, १८ एप्रिल रोजी शेतकरी व पाणी वापर संवाद, १९ एप्रिल रोजी भूसंपादन व पुनर्वसन इ. अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी, २० एप्रिल रोजी कालवा स्वच्छता अभियान, २१ एप्रिल रोजी उपसा सिंचनाचे पाणी परवानगी देण्यासाठी तक्रारीचे निरसन करणे, २२ एप्रिल रोजी अनधिकृतपणे वाणिज्य व औद्योगिक पाणी उपसा प्रकरणे शोध घेवून कार्यवाही करणे, २३ एप्रिल रोजी जलसंपदा व कृषि विभागामार्फत संयुक्तपणे पीक पध्दतीबाबत उत्पादकता वाढ, पाण्याचे नियोजन इ. बाबत बैठक, कार्यशाळेचे आयोजन. २४ एप्रिल रोजी सिंचन-ई-प्रणाली, पाणी दर, पाणी पट्टी आकारणी व वसुली थकीत पाणीपट्टी प्रकरणांचा आढावा, २५ एप्रिल रोजी विद्यापीठ केव्हीके, सेवाभावी संस्था यांचे समवेत संवाद व कृती कार्यक्रम, २६ एप्रिल रोजी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या प्रत्यक्ष पाणी वापराचा जललेखा परीक्षण व पाण्याचा पुर्नवापर न करता धरणांमध्ये व नदीमध्ये सांडपाणी येत असल्याबद्दल प्रकरणाचा शोध घेणे, २७ एप्रिल रोजी आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, २८ एप्रिल रोजी महसूल विभागाच्या समन्वयाद्वारे महामंडळाचे नावे संपादित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नोंदी घेणे, अतिक्रमण निष्कासन ३१ मे पूर्वी करणे, २९ एप्रिल रोजी पाणी वापर संस्था सक्षमीकरण, चर्चासत्र व कार्यशाळा, ३० एप्रिल रोजी पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा मुख्यालयी कार्यशाळा, महिला मेळावा, या पंधरवडा कालावधीत नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या अभियंत्याचे सत्कार व पंधरवडा समारोप असे कार्यक्रम होणार आहेत.

## तडखेल येथे महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन

**देगलुर**- तालुक्यातील तडखेल येथे अखंड शिवनाम सप्ताह आयोजित करण्यात आले होते. त्या आयोजित कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक किरण बेंबडे याचं मार्गदर्शन केले. महिला सक्षमीकरण या विषयावर बोलत असताना बेंबडे यांनी सखोल अस मार्गदर्शन केले. त्यावेळी खानापूर सर्कल चे बीट जमादार इंगोले, पोलीस कर्मचारी संभाजी पाटील, लक्ष्मण मार्गों डे,गणेश वांगिलवार (पोलिस पाटील तडखेल), बालाजी बोधने ,गोविंद मुंगडे, नारायण येवते, दिगंबर वांगीलवार व समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते.

## अपघातग्रस्त कुटुंबीयांना लसाकमने दिला मायेचा आधार

**तभा वृतसेवा**
**नांदेड दि.१४ एप्रिल-**

काही काही दिवसांपूर्वी गुंज तालुका वसमत हिंगोली येथील मजुरीसाठी जाणाऱ्या महिलांचा ट्रॅक्टर शेतातील विहिरीमध्ये पडून अपघात झाला. त्यामध्ये आठ महिलांना आपला प्राण गमवावा लागला अशा अपघात ग्रस्त मृतकांच्या कुटुंबीयांना क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी महासंघ जिल्हा शाखा नांदेड (लसाकम )चे वतीने धान्य किट चे व शैक्षणिक साहित्याचे वाटप आज दि.१३ एपील् रोजी लसाकमचे मार्गदर्शक शिवा कांबळे सर, लसाकमचे महासचिव गुणवंत काळे ,नांदेड जिल्हाध्यक्ष विजय रणखांब, जिल्हा सचिव पी एम सूर्यवंशी, वरिष्ठ उद्योग निरीक्षक शिवाजीराव कासारकर, डॉ.नामदेवराव वाघमारे , विस्तार अधिकारी कैलास गायकवाड, नारायणराव पोतरे , ल.मा.सेवाळकर ,यादवराव वाघमारे, पि.बि वाघमारे ,डॉ देवकांबळे ,उतमराव भीसे यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी लसाकमच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अपघात ग्रस्त कुटुंबियांचे दुःख द घटनेबद्दल सांत्वन केले.व सर्व अडचणी समजून घेतल्या. एवढेच नव्हे तर सामाजिक प्रश्नावर चर्चा करण्यात आली. लसाकम आपल्या अडचणी विषयावर जिल्हाधिकाऱ्यांशी व वरिष्ठाशी पाठपुरावा करेल असे लसाकम चे शिवा कांबळे ,महासचिव गुणवंत काळे सर जिल्हाध्यक्ष विजय रणखांब सर यांनी सांगितले.

## आमदारांच्या घरासमोर प्रहार संघटनेचे मशाल आंदोलन



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१४ एप्रिल-**

शेतकऱ्यांना संपुर्ण कर्ज माफी शेतमालाला हमीभाव व दिव्यांग बांधवांना सहा हजार पेंन्शन या मागण्या घेऊन भोकर विधानसभा आमदार श्रीजया चव्हाण, व नायगाव विधानसभा आमदार राजेश पवार यांच्या घरासमोर ११ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मशाल आंदोलन करण्यात केले.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख विठ्ठलराव कल्याणकर, वकील कुंटे, प्रितपाल सिंग महाराज, प्रहार दिव्यांग सचिव मारोती मंगरुळे,शिवलिंग माटोरे,राजु इबितवाड ,गोपीनाथ मुंडे,विजय हानमंते यांच्या नेतृत्वाखाली व सर्व प्रहार तालुका पदाधिकारी प्रमुख अनिल शेटे पा.मुदखेड,शाईनाथ पा.धर्माबाद,साईनाथ बोईनवाड नायगाव,हनुमंत ढगे भोकर,माधव पांचाळ मुदखेड ,शंकरराव शिंदे पा.व प्रहार कार्यकर्ते उपस्थित होते.

घोषणाबाजी देतं असताना मुदखेड, धर्माबाद,नायगाव,भोकर, महिला, पुरुष पदधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. नुकत्याच पार पडलेल्या निवडनुकीत सर्वपक्षीय आमदारांनी जाहिरनाम्यात संपुर्ण कर्जमाफी करणार असे शेतकऱ्यांना आश्वासंन दिले होते. मात्र सत्तेत आल्यानंतर सरकारने दिलेल्या घोषणांचा विसर पडला आहे. या सरकारला आणि आमदारांना जागे करण्यासाठी प्रहार संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू यांच्या आदेशानुसार राज्यभरात सर्व आमदारांच्या घरासमोर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मशाल टेंबा आंदोलनं करण्यात आले.

शेतकऱ्यांच्या व दिव्यांग बांधवांच्या मागण्या पुर्ण जर झाल्या नाही तर यापुढे सर्व आमदारांच्या घरासमोर यापेक्षाही मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रहार संस्थापक अध्यक्ष बच्चु भाऊ कडू यांनी दिला आहे. या आंदोलना दरम्यान पोलिस प्रशासनाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणुन चोख बंदोबस्त ठेवला होता.

## गुरूवारी राज्यस्तरीय संगीत भजन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ एप्रिल-**

येथील कला मंदिर मागील सोमेश कॉलनीतील श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्राच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरूवार, दि. १७ एप्रिल रोजी जिंदमवाडीच्या प्रांगणात राज्यस्तरीय भव्य संगीत भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेतील पहिले पारितोषिक कै. माधव चौधरी यांच्या स्मरणार्थ रू. ७१ हजार तर कै. चंद्रशेखर लाभशेटवार यांच्या स्मरणार्थ ५१ हजाराचे द्वितीय बक्षिस आणि कै. विश्वनाथ अप्पा हुरणे यांच्या स्मरणार्थ ३१ हजाराचे तृतीय बक्षिस ठेवण्यात आले आहे. याशिवाय उत्तेजणार्थ ४ बक्षिसे तसेच उत्कृष्ट अभंग, उत्कृष्ट गवळण व उत्कृष्ट भक्तीगीत गाणाऱ्या भजन संघातील स्पर्धकाला वैयक्तिक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात येणार असून प्रथम, द्वितीय, तृतीय व वैयक्तिक विजेत्यांना स्मृतिचिन्हेही देण्यात येणार आहेत.

ही स्पर्धा दि. १७ रोजी सकाळी ९ वाजता सुरू होणार असून रात्री स्पर्धा संपेपर्यंत चालणार आहे. स्पर्धकांसाठी मंदिरातर्फे नास्ता, चहा व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक स्पर्धक संचाला प्रवेश फिस १०००/- रूपये आकारली जाणार असून स्पर्धेचे नियम व अटी स्पर्धक संघांना लागू असणार आहेत. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी विलास गारोळे, रमाकांत जोशी, कृष्णा चौधरी, डॉ. प्रमोद देशपांडे, सौ. आनंदी विकास, विनोद राणे यांच्याकडे संपर्क करावा, असे संयोजन समितीने कळविले आहे.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी भगवानराव देशमुख, दिवाकर मुगटकर, संजय जोशी, डॉ. वैशाली गोस्वामी, प्रा. जगदीश देशमुख रमाकांत चाटी, पत्रकार विजय जोशी, पत्रकार विजय बंडेवार, पंकज शिरभाते, अमोल मालेगावकर, सुशांत पांडे, गणेश अण्णा, रागिणी जोशी, माधवी पाठक, वेदांत भुतडा व स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र विश्वस्त मंडळ नांदेड अहोरात्र परिश्रम घेत आहेत.




नांदेड- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त मनोज वाघमारे, निखिल वाडीकर व रामदास कदम मित्र परिवाराने डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, यांचे हस्ते बाह्यरुग्ण विभाग व अपघात विभागाकरिता पेशंट ट्रॉली व व्हील चेअर भेट दिली.

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ एप्रिल-**

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक आपल्या वार्डातील अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी विभागीय आयुक्त संवाद साधणार आहेत.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास थांबविण्यासाठी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे 'संवाद मराठवाडयाशी' या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता विभागीय आयुक्त दिलीप गावडे नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारी उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरपरिषद सह आयुक्त देविदास टेकाळे, नगर प्रशासन विभागाच्या लिस पोरे, संजय केदार उपस्थित असणार आहेत.

प्रत्येक आठवडयात संवाद साधला जाणार आहे. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी नगर विभाग विभागाच्या सबंधित विषयावर विभागीय आयुक्त दिलीप गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

नागरिकांनी नगर विकास विभागाशी सबंधित योजना, प्रश्न, असलेल्या अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच याबाबत असलेल्या अडचणीबाबत थेट विभागीय आयुक्त यांच्याशी संवाद साधता येणार आहे.

नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे अवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



बिडकीन दि.१४ एप्रिल पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच.सलीम महंमद पठाण ग्रामपंचायत अधिकारी आशाताईं तुपे यांच्या हस्ते महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करुन १३४ वी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी उपस्थित उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,रेखा इंदापुरे,मीरा हाडे,गायत्री तुपे,मीना पवार,अनिता पठारे,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे, शिवाजी गोरे,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने गावकरी आदींची उपस्थित होते.



गंगापूर दि.१४: भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार शिवरत्न, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती रिपब्लिकन सेना गंगापूरच्या वतीने साजरी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला रिपब्लिकन सेनेचे जिल्हा सचिव बाबा भिवसाने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी रिपब्लिकन सेना गंगापूर तालुका अध्यक्ष आनंद भिवसाने, गंगापूर शहराध्यक्ष आबू चाऊस, गंगापूर तालुका उपाध्यक्ष नारायण फुलारे, माजी नगरसेवक राजू खाजेकर, अशोक पवार मुक्तार शेख, त्रिभुवन, यांच्यासह आदी होते.



गंगापूर दि.१४: गंगापूर तालुका वकिल संघात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी वकील संघाचे अध्यक्षड.किशोर कऱ्हाळे उपाध्यक्ष ड.अमोल ठाकूर सदस्यरविराज दारुंटे योगेश जाधव व्ही जे कसाने आर के दारुंटे व्ही जी खाजेकर विशाल माघाडे राहुल माघाडे बी एस शिंदे ,एस बी सावंत व्ही बी वाघचौरे ए बी कुलकर्णी डी व्ही साबणे पी आर बरडे एम ए राऊत अमित बर्वे एस के लोहाळे ए डी शिरसाठ प्रणव चंद्रात्रे आदी सदस्य उपस्थित होते.



पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, बिडकीन येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली प्रथम शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ राशीनकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाची सुरवात .प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर यांनी विद्यार्थ्यांना ब्यारिस्टर डॉ. बाबासाहेबांचे अनमोल विचार सांगून जीवनकार्याचा गौरव केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीधर जऱ्हाड यांनी मानले, कार्यक्रम यशस्वीतेसाठी खुशाल चव्हाण,रायभान रक्ते, कमलाकर काळे,सुनील पवार, अप्पा किसवे, श्रीम विश्रांती सलगरे, आशुतोष झारगड, सुभाष राठोड बंडू डुबे यांनी सहकार्य केले. संविधानाने कार्यक्रम संपन्न झाला.

## पूजनीय बाबासाहेब आंबेडकर रामजी सपकाळ यांचे १४ वे रत्न होते : अरुण नेटके

### विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामा तर्फे पूजनीय बाबासाहेबांना विनम्र अभिवादन



छत्रपती संभाजीनगर – पूजनीय बाबासाहेबांचे वडील श्री.रामजी सपकाळ हे रावळपिंडीच्या मिलिटरी कॅम्प मध्ये सुभेदार होते ते तिथे शिकवायचे काम करत असत. १८७९ ला रामजी सपकाळ यांचे भिमाबाई बरोबर लग्न झाले तेथेच परिसरातील एका नदीवर भिमाबाई धुणं धुण्यासाठी गेल्या असता परिसरातून जात असलेल्या एका संतांच्या जथ्थ्यामधील एकाने भीमाबाई इकडे कुठे असा आवाज दिला.या अपरिचित भागात भीमा या नावाने मराठीतून आवाज देणारा संत कोण म्हणून त्यांनी त्यांना परिचय विचारला तेव्हा ते म्हणाले तुमच्या पतीचा म्हणजेच रामजीचा मी मोठा भाऊ रामानंद संप्रदायाचा संन्याशी आहे. तेव्हा भिमाबाईंनी त्यांना घरी येण्याचे निमंत्रण दिले दुसऱ्या दिवशी संतांचा जत्था रावळपिंडी मधील श्री.रामजीच्या घरी आला त्यांनी भजन केले आणि निघताना भिमाबाई ची ओटी भरली आणि म्हणाले की आपल्या घराण्याची ही आमची संन्याशाची शेवटची पिढी आहे.यानंतर तुझ्या पोटी एक रत्न जन्माला येईल ते आपल्या कुळाचा उद्धार करेल.बरोबर बारा वर्षांनी म्हणजेच १४ एप्रिल १८९१ ला पूजनीय बाबासाहेबांचा जन्म झाला.

पूजनीय बाबासाहेब हे श्री.रामजी सपकाळ यांचे चौदावे अपत्य म्हणजे १४ वे रत्न असे उद्गार विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम अखिल भारतीय संपर्कप्रमुख अरुणजी नेटके यांनी काढले. ते संभाजीनगर येथील विश्व हिंदू परिषदेच्या प्रांत कार्यालयात प्रांत बैठकीच्या वेळी बोलत होते. यावेळी देवगिरी प्रांतातील पदाधिकारी राजीव जहागीरदार काशिनाथ दाबके आनंदीदास रहाटेकर मोहनजी पुराणिक विनोदजी पाडळकर श्रीकांत काशीकर लक्ष्मीकांत पांडे लक्ष्मण माने आर्य बाबुराव शिरसागर योगेश पाठक विनोद शेवतेकर प्रकाश कहाळेकर राजश्रीताई भिते गौरव पवार बाबुरावजी नालमवार राजीव क्षीरसागर योगेश पाठक विनोद शेवतेकर इत्यादी प्रांत कार्यकर्ते उपस्थित होते.

यानंतर मी अरुणजी नेटके यांनी पूजनीय बाबासाहेब यांच्या कार्याचा आलेख उपस्थितासमोर मांडला.



सोयगाव,दि.१४ एप्रिल – जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मान्यवरांच्या उपस्थित उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी नगरसेवक गजानन कुडके,समाजसेवक शंकर जेठे,शिक्षणप्रेमी योगेश बोखारे,सुरेश सरोदे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे,विशाल पवार याच्या हस्ते प्रतिमा पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी पालक,विद्यार्थी,नागरीक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक,प्रशिक्षक शिक्षक यांनी परिश्रम घेतले.



बिडकीन दि १४ पैठण तालुक्यातील पाडळी गाझीपुर ग्रामपंचायत कार्यालय येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, या वेळी सरपंच लिलाबाई पवार यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले, तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला, याप्रसंगी उपसरपंच दत्तात्रय बांडे, माजी उपसरपंच चंद्रकांत हुड, ग्रामसेविका देहाडराय, प्रकाश हुड, संदीप हुड, सुभाष बांडे, भगवान हुड, शरद बांडे, विष्णू नाना, जयंती अध्यक्ष राहुल जाधव, उपाध्यक्ष जीवन गायकवाड,प्रदीप गायकवाड, सौरभ गायकवाड, आकाश गायकवाड, भानुदास गायकवाड, रतन गायकवाड,लहानु गायकवाड, योगेश गायकवाड, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व शाळेतील शिक्षक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### बिडकीन पोलीस ठाण्यात जयंती उत्साहात साजरी



बिडकीन दि १४ पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्यात भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, यावेळी वरद हॉस्पिटलचे संचालक डॉ सुरेश जंगले, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, डॉ सुरेश जंगले, पोलीस उपनिरीक्षक मंजीतसिंग सेना,एस एस कदम, संजय चव्हाण, सोमनाथ तांगडे,मगर, संदीप धनेधर, जगन्नाथ उबाळे, हनुमान धनवे, कावळे, होमगार्ड, महिला पोलीस कर्मचारी उपस्थित होते



सोयगाव,दि.१४ एप्रिल – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोयगाव येथे माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर काळे,गोपीचंद जाधव,नगरपंचायत शिवसेना गटनेता अक्षय काळे, नगरसेवक गजानन कुडके,भगवान जोहरे,हर्षल काळे,राजू दुतोंडे,तसेच दिलीप देसाई,संदीप चौधरी,शेख जावेद,श्रावण जाधव,रमेश भंगी,अरुण वाघ,हर्षल देशमुख,वसंत चव्हाण आदींची उपस्थिती होती.




सोयगाव,दि.१४ एप्रिल : येथील कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सकाळी शाळेच्या कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक निलेश पाटील, उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. तसेच शाळेचे शिक्षक व शिक्षिका यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या वेळी शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतनिमित्त आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार

खुलताबाद ,: खुलताबाद प्रतिनिधी डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे१४/४/२०२५ दुपारी ११.४५ वाजता सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त, जनाधार व खरा सामना संचलित चौथा स्तंभ पत्रकार संघर्ष समिती तर्फे आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार २०२५चा सन्मान सेवेचा;! गौरव कर्तुत्वाचा! गौरवार्थ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंता शिरसाट गल्ले बोरगावकर यांनी केले आहे. नुपूर विशाल शिरसाट (आय टी. इंजिनिअर) यांचे मोलाचे सौजन्य मिळाले आहे. उपाध्यक्ष सुधीर जेठे यांनी गौरव मूर्ती यांचा परिचय दिला. गौरव मूर्ती स्वरूप कंकाळ तहसीलदार, .पो. नि फराटे साहेब, .सूनील घोडके (पत्रकार ); श्रीकांत कुलकर्णी पत्रकार संतोष करपे पाटील(पत्रकार), . शेख जमीर (पत्रकार), . किशोर पुसे (पत्रकार ); . चांदखा पठाण (पत्रकार); अर्चना दिनेश अंभोरे; (सभापती) मा .दिनेश अंभोरे; (मा सभापती), सौ.बबिता मेश्राम (ग्रामपंचायत अधिकारी), दिनकर काळे (वकील) विजय राठोड (वकील) शिवाजी वावरे (ग्रामपंचायत अधिकारी); विशाखा नितीन जाधव (सरपंच), शिल्पा अमित जाधव (सरपंच); मिनाबाई किर्तीकर(सरपंच); योगेश जगन्नाथ खोसरे,(मुख्याध्यापक); . मंगला तीलवणे, (मुख्याध्यापक) . संतोष राजपूत (. उपसरपंच); .वाल्मिकी जाधव (ग्रामपंचायत अधिकारी); संजय मोरे (शिक्षक);. राजेंद्र बडे, मां. जनार्धन उबाळे (पोलीस पाटील), . कचरू नेवगे (ठेकेदार) अविनाश नाना कुलकर्णी (ठेकेदार); . मंगेश शिंदे (विस्तार अधिकारी खुलताबाद); . ढवळे दादा, . शंकर अंभोरे (अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन अध्यक्ष) मा.नितीन भवरे , मां. म्हस्के बि. आर. (ग्रामपंचायत अधिकारी); .गणेश धनवई (ग्रामपंचायत अधि कारी); पालवे एस. आर. (ग्रामपंचायत अधिकारी); भालेराव बि. एल.(ग्रामपंचायत अधिकारी ): (समाजसेवक); . महेंद्र घुसळे (समाज सेवक); किशोर जाधव (समाजसेवक). आदी. आभार सचिव नाईन शहा यांनी आभार मानले

## संघ हीच जीवनगाथा



अलकः– (९०) संघ बंदी

४ फेब्रुवारी १९४८ ला महात्मा गांधींच्या हत्येनंतर केवळ संशयानी सर्वप्रथम संघावर बंदी घातली. १२ जुलै १९४९ ला बंदी उठवली. त्यानंतर आपल्या विचाराचा आपल्या बाजूने आवाज उठवणारा एक राजकीय पक्ष हवाच, अन्यथा हे राजकारणी आपल्याला संपवतील, हा विचार पक्का झाल्यावर श्री गुरुजी व श्री बाळासाहेब देवरस यांच्या प्रयत्नामुळे ऑक्टोबर १९५१ मध्ये भारतीय जनसंघ स्थापन झाला. या राजकीय पक्षात शामाप्रसाद मुखर्जी– लालकृष्ण अडवाणी– अटल बिहारी बाजपेयी – दीनदयाल उपाध्याय– नानाजी देशमुख असे लोक होते त्यानंतर २५ जून १९७५ ला इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली. व जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात ठड्ढनी सहभाग नोंदवला म्हणून ४ जुलै १९७५ ला संघावर दुसरी बंदी लादली. तेव्हा भारतभरात लाखो संघ स्वयंसेवक जेलमध्ये होते. आणीबाणी हटवल्यानंतर भारतीय जनसंघ जनता पार्टीत विलीन झाला व जनता पार्टी सत्तेवर आली. या नवीन सरकारने मार्च २०२२ ला संघावरची बंदी उठवली. परंतु त्यानंतर १९८० मध्ये जनता पार्टी तुटली व भारतीय जनता पक्ष (इगझ) या नावाने पूर्वीचा जनसंघ उदयाला आला.

त्यानंतर विश्व हिंदू परिषदेने अयोध्या आंदोलन केले व त्यांनी सोमनाथ अयोध्या रथयात्रा काढली. त्यांनी मंदिराचे कुलूप उघडले. शिलापूजन केले. खूप लोकांचा सहभाग सहकार्य व प्रेम मिळाले. नंतर १९८४ मध्ये भाजपाला लोकसभेत फक्त दोन जागा मिळाल्या होत्या परंतु बाबरी ढाच्या फोडला म्हणून १९९२ मध्ये परत तिसऱ्या वेळेस संघावर बंदी घातली. परंतु ती १९९३ मध्येच उठवली. पुढे २००२ सालापासून १५ ऑगस्ट २६ जानेवारीला संघ कार्यालयावर तिरंगा ध्वज व भगवा ध्वज असे दोन्ही ध्वज फडकू लागले.

भारत माता की जय क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




## जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' चे आयोजन

अहिल्यानगर दि.१४– नागरिकांना पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देण्याबरोबरच जलसाक्षरता वाढीसाठी जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' चे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जलसंपदा विभागामार्फत देण्यात आली आहे.

जलसंपदा पंधरवडा शुभारंभ १५ एप्रिल २०२५ रोजी करण्यात येईल. १६ एप्रिल रोजी जलसंपदा अधिकारी,कर्मचारी यांचे प्रशिक्षण व ई–ऑफिस प्रणाली कार्यान्वित करणे, १७ एप्रिल रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, जल पुनर्भरण, १८ एप्रिल रोजी शेतकरी,पाणी वापर संस्था संवाद, १९ एप्रिल रोजी भूसंपादन व पुनर्वसन इ. अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी आणि २० एप्रिल रोजी कालवा स्वच्छता अभियान रबविण्यात येणार आहे.

उपसा सिंचनाचे पाणी परवानगी देण्यासाठी तक्रारींचे २१ एप्रिल रोजी निरसन करण्यात येणार आहे.



खुलताबाद प्रतिनिधी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त खुलताबाद नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी तथा प्रशासक शेख समीर यांनी पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसर त मंडप लाइटिंग डेकोरेशन. सुशोभीकरण करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली . खुलताबाद , नगरपरिषदेतील कर्मचारी. गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होती .

### मोफत लेन्स बदलण्याचा कार्यक्रम सुरू

मुंबई : मोठ्या संख्येने भारतीय जुने चष्मे घालतात – स्वतःच्या इच्छेने नाही, तर लेन्स बदलणे हे अनेकदा महाग आणि गैरसोयीचे मानले जाते म्हणून. तथापि, नेत्र आरोग्य व्यावसायिक चेतावणी देतात की लेन्स अपडेट करणे पुढे ढकलल्याने डोळ्यांवर सतत ताण येऊ शकतो, डोकेदुखी होऊ शकते, दृष्टी अंधुक होऊ शकते आणि उत्पादकता कमी होऊ शकते.

४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींसाठी, वयानुसार धोका वाढतो. बऱ्याच लोकांना प्रेस्बायोपिया होऊ लागतो – ही एक नैसर्गिक, वयाशी संबंधित स्थिती आहे ज्यामध्ये डोळ्याच्या लेन्सची लवचिकता कमी होते, ज्यामुळे जवळच्या वस्तूंवर लक्ष केंद्रित करणे कठीण होते. जर प्रीस्बायोपिया दुरुस्त न केल्यास, त्याचा दैनंदिन कामगिरी आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

